महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,

कार्यालय

जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, अहिल्यानगर

अहमदनगर जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था इमारत, ३ रा मजला, न्यू टिळक रोड, अहिल्यानगर४१४००१.
Email ID - dsaahmednagar@reddifmail.com

जा.क्र. जिविलेप/ले.प्र.अह/कृउबास कर्जत/२०२४-२५/ /सन-२०२६ दिनांक- / ०३ /२०२६

प्रति,
मा. सभापती /सचिव,
कृषी उत्पन्न बाजार समिती, कर्जत
ता. कर्जत, जि. अहिल्यानगर.

विषय:- आपले बाजार समितीचे सन २०२४-२५ च्या शासकीय लेखापरीक्षणाबाबत...
संदर्भ:- मा.पणन संचालनाय.महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेश जा.क्र/पणन-५(लेप)/कृउबास/ /अ.नगर जिल्हा/ले.प.वा.मंजुरी/२४-२५/२६७०/सन २०२५, दि.२५.०७.२०२५.

वरील संदर्भिय आदेशान्वये, **कृषी उत्पन्न बाजार समिती, कर्जत, ता.कर्जत, जि.अहिल्यानगर** या बाजार समितीचे दि.०१/०४/२०२४ ते दि.३१/०३/२०२५ या कालावधीचे शासकीय लेखापरीक्षण पुर्ण केले असुन त्याबाबतचा लेखापरीक्षण अहवाल बाजार समितीस सादर करीत आहे.

लेखापरीक्षण अहवालातील भाग अ, ब, क मधील दोषांची पुर्तता करुन दोषदुरुस्ती अहवाल महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम १९६३ चे कलम ३९ (ओ) ४० व नियम ११६ (ब) अन्वये दोन महिन्यात ओ नमुन्यात पाच प्रतीत या कार्यालयाकडे पाठविण्यात यावा.

(गौतम निकाळजे)
जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१
सहकारी संस्था, अहिल्यानगर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर :-

१. मा. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर.
३. मा. जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, अहिल्यानगर
४.

जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१
सहकारी संस्था, अहिल्यानगर.

कृषी उत्पन्न बाजार समिती कर्जत जि.अहिल्यानगर

शासकीय लेखापरीक्षण अहवाल

दि.०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५

(नमुना क्र.३)

१)	**सर्वसाधारण:-**			
१.	लेखापरीक्षा नोंदवही प्रमाणे लेखापरीक्षणअहवालाचा अनुक्रमांक		--	
२.	बाजार समितीचे नांव		कृषी उत्पन्न बाजार समिती, कर्जत तालुका-कर्जत जिल्हा-अहिल्यानगर.	
३.	बाजार क्षेत्र		कर्जत तालुका.	
४.	दुय्यम बाजाराची नावे		मिरजगांव, राशीन,	
५.	शेतीमालाचे नियमनकरणा-या शासकीय अधिसुचनेचा क्रमांक व दिनांक		मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर जा.क्र. एमकेटी/एपीएमसी/डिव्हीजन/१९८४ दि.१२/०९/१९८४	
६.	लेखापरीक्षण करणा-या अधिका-याचे नांव व पदनाम		गौतम निकाळजे जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारीसंस्था, अहिल्यानगर	
७.	लेखापरीक्षण कालावधी अ) लेखापरीक्षण सुरु दिनांक ब) लेखापरीक्षण पुर्ण दिनांक क) लेखापरीक्षण अहवाल सादर दिनांक		१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ २५.०९.२०२६ २९.०१.२०२६ १५.०२.२०२६	
८.	वेगवेगळया मतदारसंघातील बाजार समितीच्या सदस्यांची यादी मिळवा आणि ती लेखापरीक्षण अहवाला सोबत जोडा.		सोबत यादी जोडली आहे.	
२)	**लेखापरीक्षणदोषदुरुस्ती:-**			
१.	गेल्या लेखापरीक्षण अहवालात उल्लेख केलेल्या महत्वाच्या मुद्दयांकडे दुर्लक्ष केले आहे काय?		नाही परंतु अहवालातील शेरे पहा	
२.	बाजार समितीने दोष दुरुस्ती अहवाल सादर केला आहे काय? असल्यास तो सादरकेल्याचा क्रमांक व दिनांक लिहा		होय. पहावयास मिळाला नाही.	
३)	**अनुज्ञप्ती(लायसेन्स)**			
१.	अनुप्ती नोंदवही योग्य रितीने ठेवली असून ती अदयावत लिहीलेली आहे काय?		होय शेरे पहा	
२.	बाजार समितीने वेगवेगळया प्रकारच्या अनुज्ञप्ती धारकांची संख्या आणि त्यांच्याकडून वसूल केलेली शुल्क खालील नमुन्यात लिहा		सोबत यादी जोडली आहे.	
अ.नं	अनुज्ञप्तीधारकांचावर्ग	संख्या	अनुज्ञप्ती शुल्काचा दर	मिळालेले एकूण शुल्क
	सोबत तक्ता जोडला आहे.			
३.	अ)अनुज्ञप्ती धारकाकडून अनुज्ञप्तीसाठी घेतलेले कर्ज आणि करारनामे बरोबरआहेत काय?		होय शेरे पहा	
	ब) बाजार समितीने ती योग्यरितीने मंजूर केले आहेत काय?		होय शेरे पहा	
	क) आवश्यक तेथे अनुज्ञप्तीचे नुतनीकरण केले आहेत काय?		होय शेरे पहा	

	ड) वर्षात एखादी अनुज्ञाप्ती निलंबित किंवा रद्द केली आहे काय?	नाही.
	इ)अशा निलंबित अथवा रद्द केल्या बाबत कायदा नियम व पोटनियमयांत घालून दिलेल्या पध्दतीने योग्यरितीने अनुपालन केले आहे काय?	लागू नाही.
४)	**तोला-या:-**	
१.	तोला-याकडून ठेवी घेतल्या आहेत काय?	नाही.
२.	प्रत्येकतोला-यासाठी अशा ठेवी ची रक्कम पोटनियमांत किती ठरविली आहे.	नाही.
३.	सर्वतोला-यांना बिल्ले दिले आहेत काय? बिल्यांना शिलकी माल तपासा.	होय शेरे पहा.
५)	**शेती मालावरील बाजार शुल्के:-**	
१.	शेती माला वरील बाजार शुल्काचे दर दया.	सोबत तक्ता जोडला आहे.बाजार फी शेकडा १/-रु.व देखरेख खर्च शेकडा ५पैसे.
२.	वेगवेगळया शेतीमालाची एकूण आवक आणि वर्षात त्यावर गोळा झालेले एकूण शुल्क दया.	सोबत तक्ता जोडला आहे.
३.	पोटनियमांत ठरवून दिलेल्या दराप्रमाणे सर्व आवकवरील शेतीमालावरील बाजार शुल्क वसूल केले आहेत काय याची खात्री करा.	होय सोबत तक्ता जोडला आहे.
४.	शेतीमालावरील बाजार शुल्क आवक नोंदवही प्रमाणे वसूल केल्याचे शेतीमाला वरील बाजार शुल्काचा नोंदवहीत दर्शविले आहेत काय?	होय शेरे पहा
६)	**वांधे(डिसप्युटस):-**	
१.	वांधे नोंदवही पहा आणि वांधे निर्णयासाठी ठरवून देण्यात आलेली शुल्के वसूल झाल्याची खात्री करा.	अहवाल वर्षात वांधा नाही.
२.	निर्णित वांध्यांची एकूण संख्या आणि वर्षात वसूल झालेल्या शुल्काची एकूण रक्कम दया.	अहवाल वर्षात वांधा नाही.
३.	अ) वांधा निर्णय मंडळा चीरचना योग्य रितीने झाली आहे काय?	नाही
	ब) त्यांनी मिटविलेल्या वांध्यांची संख्या लिहा.	नाही.
७)	**बाजार समितीचे दैनंदिन कामकाज:-**	
१.	बाजार समितीने भावाच्या दैनंदिन यादयांची कागदपत्र ठेवली आहेत काय?	होय.
२.	कानू क्र.२४ आणि २५ च्या तरतुदीनुसार बाजारात वापरांत असलेली तराजू आणि मापेयांची नियतकालीन तपासणी केली आहे काय?	होय.
३.	बाजार समितीने शेतीमालाची भेसळ रोखण्यासाठी वर्षात काही कारवाई केली आहे काय?	नाही.अशी तक्रार आलेली नाही असे सांगण्यात आले.
४.	वर्षात भरलेल्या वेगवेगळया सभांची एकूण संख्या लिहा	वार्षिक सभा दिनांक ३०/९/२०२४ झाली आहे. आणि संचालक मंडळ सभा-०८
५.	अ) लेखापरीक्षण शुल्काची आकारलेली मागणी शुल्काची एकूण रक्कम दया आणि ती कोणत्या कालावधीसाठी आकारली ते लिहा	सन २०२३-२४ रु. ९९४९६/-
	ब) लेखापरीक्षण शुल्क भरल्याच्या चलनाचा क्रमांक आणि दिनांक भरलेली रक्कम आणि ज्या कोषागारातती भरलेली आहेत त्याची नावे लिहा	सन २०२३-२४ रु.९९४९६/- दिनांक १७.०९.२०२५ रोजी भरणा स्टेट बँक ऑफ इंडिया,शाखा-.कर्जत

	क) जर लेखापरीक्षण शुल्क थकविले असेल तर तपशिल देऊन न भरल्याची कारणे दया.	थकीत नाही
६.	अ) रोख शिल्लक मोजा आणि ज्या दिनांक मोजली ते नमूद करुन किर्दीवर सही करा.	दि. ३१.१२.२०२५ रु. ४४७५९५.४२ पै.
	ब)ज्याअधिका-याने मोजण्यासाठी शिल्लक दिली त्याचे नांव किर्दीवर नमूद करुन सही करा.	कोषपाल पदरिक्त असल्याने प्र. सचिव विकास तनपुरे यांनी मोजण्याकरिता दिली
	क)आपल्या जवळ रोख शिल्लक ठेवण्यास ते प्राधिकृत आहेत काय?	होय
	ड) किर्दी प्रमाणे रोख शिल्लक बरोबर आहे काय?	होय
७.	बँक पासबुकात किंवा बँकेच्या पत्रकांत आणि बँकेच्या शिलकेच्या प्रमाणपत्रात दाखविलेल्या बँक बाक्या लेखापुस्तकांत दर्शविलेल्या अशा बाक्या जुळतात काय? नसल्यास ताळेबंद पत्रक तपासा.	शेरे पहा.काही खात्यामध्ये फरक पडलेले आहेत. समितीने ताळमेळ पत्रक तयार करुन लेखापरीक्षणासाठी तयार करुन दिलेले नाहीत.
८.	अ) रोखे आणि शिल्लक मालयांची प्रत्यक्षात रुजवात घ्या.	घेतली.
	ब) रोख्यावरील लाभांशाचा आणि व्याजाच्या रकमा नियमितपणे गोळा केल्या जात आहेत काय	होय.
	क) रोखे जर बँकेकडे ठेवली असतील तर तसे प्रमाण पत्रे मिळवून दप्तरी ठेवली आहेत काय?	होय.
	ड)गुंतवणूक नोंदवही ठेवली आहे काय? असल्यास ती अदयावत भरली आहे काय?	होय.
	उ) लेखापरीक्षा अहवाल पाठविण्यापुर्वी आपण त्यांच्या मसुदयावर चर्चा बाजार समितीच्या बैठकीत केली आहे काय	होय.
	ऊ) शेतीमाल विक्रीचे योग्य प्रकारे नियमन करण्यासाठी पुरेशी कार्यवाही करण्यात आली आहे काय	होय,
८)	**कायदा नियम व पोटनियम:-**	
१.	बाजार समिती जवळ कायदा कानू व पोटनियमयाची प्रत आहे काय?	होय.
२.	कायदा व कानू पोटनियमयांचे उल्लंघन झाल्याच्या नोंदी घ्या.	अहवालातील शेरे पहा.
	१.कायदा कलम क्रमांक	अहवालातील भाग ब पहा
	२.कानू क्रमांक	अहवालातील भाग ब पहा
	३.पोटनियम क्रमांक	अहवालातील भाग ब पहा
३.	पोटनियमानुसार काही नियम तयार केले आहेत काय? योग्य त्या प्राधिका-याकडून ते संमत करुन घेतले आहेत काय?	नाही.
९)	**जमिनी इमारती आणिअन्य बांधकामे:-**	लागू नाही
१.	आपल्या उपयोगासाठी बाजार समितीने खरेदी केलेल्या अगर भाडयाने घेतलेल्या जमिनीच्या हक्क पत्राची किंवा भाडेपटयाची काळजीपुर्वक तपासणी करा.	लागू नाही
२.	जेव्हा इमारती आणि अन्य बांधकामे कंत्राटी पध्दतीने बांधतात तेव्हा ती कंत्राटांच्या मर्यादेत आहेत काय ते पहा	होय
३.	खात्यामार्फत बांधकामे करण्यात येतात का पहा.	
	अ)भांडवली आणि महसुली स्वरुपाच्या बाबतीत खर्चाचे विभागणी योग्य रितीने झाली आहे काय?	होय,शेरे पहा.
	ब)अर्हता प्राप्त स्थापत्य विशारद आणि अभियंतेयांची मूल्य निर्धारण प्रमाणपत्रे मिळविली आहेत काय?	होय

	क)मोजणी पुस्तके आणि कामाच्या नोंदवहया ठेवल्या आहेत काय?	होय
४.	निविदा(टेंडर्स) आणि भाव दर पत्रके मागवून नागरी बांधकामे केली आहेत काय?	होय
५.	निविदा आणि अंदाज पत्रके सक्षमप्राधिका-याकडून मंजूर करुन घेतली आहेत काय?	होय
६.	कंत्राटदाराकडून करारनामे व इसा-याची रक्कम घेतली आहे काय?	होय
७.	मालमत्ता नोंदवही योग्य नमुन्यात ठेवली आहे काय?	होय
८.	अर्हता प्राप्त स्थापत्यविशारद आणि अभियंतेयांचेकडून सर्वबाबतीत पुर्तत ाप्रमाण पत्र मिळविले आहेत काय?	होय
९.	नागरी बांधकामावरील खर्चासाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतुद आहे काय?	तपासणी कालावधीत नवीन बांधकाम नाही.
१०.	अ)गेल्यावर्षा अखेर झालेला खर्च,चालू वर्षात झालेला खर्च आणि एकूण खर्च दर्शविणारा सर्व बांधकामाची यादी दया.	सादर केली नाही.
	ब)सर्व नागरी बांधकामाची रुजवात घ्या.	तपासणी कालावधीत नवीन बांधकाम नाही.
१०)	**बाहेरीलकर्जे:-**	
१.	बाजार समितीने घेतलेल्या कर्जाची खालील प्रमाणे माहिती दया	बाजार समितीने बाहेरील कर्जे घेतलेली आहेत.

कर्ज मंजूर करणारे माध्यम	मंजूर रक्कम	घेतलेलीकमाल रक्कम	परतफेडके लेली रक्कम	अदत्त रक्कम	थकीत रक्कम
०	०	०	०	०	०

२.	परत फेड वक्त शीर पणे होत आहे काय?	निरंक
३.	विविध कर्जे देताना घालण्यात आलेल्या शर्तीचे अनुपालन होत आहे कायउल्लंघने नमूद करा.	होय,
११)	**खर्च:-**	
१.	जमा आणि खर्चाचे अंदाजपत्रके तयार केली आहेत काय? ती सक्षमप्राधिका-याकडे मंजूरीसाठी सादर केली आहेत काय?	होय
२.	अंदाजपत्रकाच्या मर्यादेहून जर काही अधिक खर्च झाला असेल तर पुर्नविनियोजन पत्रके (रिॲप्रोप्रिएशन) सक्षमप्राधिका-याकडे मंजूरीसाठी सादर केली आहेत काय?	होय,शेरे पहा.
३.	खर्चाची पत्रके बाजार समितीच्या संमतीसाठी वेळोवेळी ठेवली जातात काय?	होय,शेरे पहा.
४.	बाजार समितीच्या व्यवहाराशी संबंध नसलेल्या खर्चाची नोंद घ्या.	होय,शेरे पहा.
५.	नगरांतर दुरध्वनी ठेवली आहे काय? खाजगी दुरध्वनीचा आकार वसूल केला जातो काय.	नाही
६.	जेव्हा छपाई काम देता तेव्हा किंवा लेखन सामुग्री आणि जड वस्त ूसंग्रह खरेदी करीता तेव्हा पहा:-	नाही
	अ) निविदा किंवा भाव दर पत्रके मागविली आहेत काय?	होय
	ब) यासाठी बाजार समितीने निश्चित पध्दत ठेवली आहेत काय?	होय
	क)जडसंग्रहसामान,छपाई माल आणि लेखन सामुग्रीयांची आवक दिलेल्या आदेशा नुसार आहे यावर योग्य नियंत्रण आहे काय?	होय
१२)	**झीज:-**	
१.	जड संग्रह सामान,स्थावर मालमत्ता इ. वर योग्य झीजेची तरतूद केली आहे काय?	होय..
२.	ज्या दराने तरतूद केली आहे ते दर दया.	सोबत यादी जोडलेली आहे.

१३)	कर्मचारीवर्ग:-	
१.	कर्मचारी यांचे नाव व पदनाम, शैक्षणिक पात्रता, वेतनश्रेणी, हल्लीचे वेतन आणि भत्ते, ज्या दिनांकापासून नोकरीस घेतले तो दिनांक,घेतलेले जामिन, इतर माहिती दर्शविणारी कर्मचा-यांची यादी मिळवून ती लेखापरीक्षण अहवाला सोबत जोडा.	सोबत यादी जोडली आहे.
२.	कर्मचा-यांच्या नेमणूका सक्षम प्राधिका-याकडून यथोचितरित्या संमतझाल्या आहेत काय?	होय
३.	कर्मचा-यांच्या बाबतीत भविष्य निर्वाह निधी उभारला असेल तर लिहा	होय.शेरे पहा.
	अ) सक्षम प्राधिका-याकडून संबंधित नियम संमत करुन घेतले आहेत काय?	होय.शेरेपहा.
	ब) निधीचा रक्कम स्वतंत्रपणे गुतवणूक केली आहे काय?	होय.शेरे पहा.
	क) भविष्य निर्वाह निधीचे हिशोब स्वतंत्रपणे ठेवले आहेत काय?	होय.शेरे पहा.

स्थळ :- कर्जत
दिनांक :- / /२०२६

Vikram

(गौतम निकाळजे)
जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१
सहकारी संस्था, अहिल्यानगर.

कृषि उत्पन्न बाजार समिती, कर्जत ता. कर्जत जि. अहिल्यानगर

वैधानिक लेखापरिक्षण अहवाल

कालावधी सन २०२४-२५

०१. **प्रस्तावना –**

कृषि उत्पन्न बाजार समीती कर्जत, ता कर्जत, जि अहमदनगर या बाजार समीतीची स्थापना मा. असिस्टंट सेक्रेटरी, गर्व्हर्नमेंट ऑफ बॉम्बे, डेव्हलपमेंट डिपार्टमेंट, सचिवालय, मुंबई यांचे नोटीफिकेशन नुसार झाली आहे. मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांचे नोटीफिकेशन क्रमांक A/MKT/APMC/DIVN/1984 दिनांक १२.०९.१९८४ नुसार श्रीगोंदा बाजार समीतीचे विभाजन करुन कर्जत कृषी उत्पन्न बाजार समीती अस्तित्वात आलेली आहे. कृषि उत्पन्न बाजार समीती कर्जत, ता कर्जत, जि अहमदनगर नोंदणीकृत पत्ता हा प्रधान कार्यालय, राशीन रोड, ग्रामीण रुग्णालयासमोर, कर्जत, ता कर्जत, जि अहमदनगर असा आहे. कृषि उत्पन्न बाजार समीती कर्जत, ता कर्जत, जि अहमदनगर या समीतीचे दिनांक ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीचे वैधानिक लेखापरिक्षण मा. पणन संचालनाय.महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेश जा.क्र/पणन-५(लेप)/कृउबास/अ.नगरजिल्हा/ले.प.वा.मंजुरी/२४-२५/२६७०/सन२०२५,दि. २५.०७.२०२५ नुसार पूर्ण करण्यात आले आहे. लेखापरीक्षण कामी अधिनस्थ उप / लेखापरीक्षकांची मदत घेण्यात आलेली आहे.

मागील सन २०२३-२४ या कालावधीचे समीतीचे लेखापरीक्षण झालेले असून त्याचा लेखापरिक्षण अहवाल सादर करण्यात आलेला आहे. बाजार समितीने त्याचा दोष दुरुस्ती अहवाल पाठविलेला असून दप्तरी पहावयास मिळालेला नाही.

लेखापरीक्षणाचे कामकाज आर्थिक मांडणी पध्दतीने पार पाडलेले आहे. सदर लेखापरीक्षणासाठी समीती सभापती, सचिव आणि लेखापाल व सह कर्मचा-यांनी समीतीचे रेकॉर्ड, आर्थिक पत्रके, याद्या, हिशोबी नोंदवहया, परिशिष्टे तपासणीसाठी सादर केले असून दिलेल्या लेखी व तोंडी माहिती व खुलाशांचे आधारे व उपलब्ध आणि सादर केलेल्या रेकॉर्डनूसार लेखापरीक्षण कामकाज पूर्ण केले आहे व त्यानुसार अभिप्राय व शेरे लेखापरिक्षण अहवालात नमूद केलेले आहेत. अहवालातील सर्व शे-यास पात्र राहुन लेखापरिक्षण पूर्ण करण्यात आले असून सोबत समीतीची आर्थिकपत्रके व तत्सम याद्या व परिशिष्टे जोडली असून त्यानुसार समीतीची आर्थिक परिस्थिती दिसून येईल व त्या अनुषंगाने संभाव्य आर्थिक व तत्सम बाबींना संबंधित जबाबदार राहतील. या व्यतिरिक्त तपासणीस सादर न केलेले दप्तर असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी बाजार समितीवर असेल..

बाजार समीतीच्या दैनंदिन व्यवहारानूसार हिशोबी पत्रके व हिशोबी रेकॉर्ड तयार करण्याची जबाबदारी समीतीच्या अधिकारी/कर्मचारी व पदाधिका-यांची असून समीतीने उत्पन्न खर्चाबाबत प्रशासक सभेतील मान्यता तसेच कृषि पणन मंडळाने मंजूर केलेल्या मुळ व पुरवणी अर्थसंकल्प (बजेट) इत्यादींचा आधार घेतलेला आहे. समीतीने सादर केलेल्या हिशोबी आर्थिक पत्रकांवर आम्ही लेखापरिक्षणाव्दारे केवळ मत प्रदर्शित करुन आमचे माहिती व व ज्ञानाप्रमाणे व उपलब्ध रेकॉर्डच्या आधारे अभिप्राय व शेरे अहवालात नमूद केले असून त्यामध्ये अभियांत्रिकी व तांत्रिक, सिव्हील इंजिनिअरींग, इलेक्ट्रीक इंजिनिअरींग व तत्सम तांत्रिक ज्ञानाचा अभाव आहे. अभियांत्रिकी व तत्सम तांत्रिक ज्ञानाबाबत आम्ही शासनाचे पणन विभाग व त्यांचे अधिन अभियांत्रिकी विभाग/मे.अभियंता तसेच बाजार समीतीने नियुक्त केलेले मे आर्कीटेक्ट इंजिनिअर, टेक्नीकल

एक्सपर्ट, कायदेशीर व आर्थिक सल्लागार इत्यांदींनी दिलेले दाखले व अभिप्राय व शिफारसी विचारात घेतलेली आहे. त्यामुळे त्यापूर्वी केलेल्या वा चालू मुदतीत केलेल्या अभियांत्रिकी व तत्सम तांत्रिक कामात व खर्चात भविष्यात काही अनियमितता अथवा गंभीर दोष आढळल्यास त्याची जबाबदारी संबंधितांची राहील. बाजार समीतीचे आर्कीटेक्ट ओमसाई कन्सलटंट हे आहेत. लेखापरिक्षण कालावधीत बाजार समितीचे सभापती म्हणून श्री. तापकीर काकासाहेब लक्ष्मण व उपसभापती म्हणून श्री. पाटील अभय पांडुरंग यांनी कामकाज पाहिलेले आहे. तसेच बाजार समितीचे सचिव म्हणून व मुख्य बाजार कर्जत येथील कामकाज श्री. सतिष एकनाथ कदम यांनी आणि उपबाजार मिरजगांव येथील कामकाज सहाय्यक सचिव श्री व्ही.डी.तनपुरे यांनी तसेच उपबाजार राशिन येथील कामकाज श्री. ए.एस. घालमे यांनी तपासणी कालावधीत कामकाज पाहीलेले आहे.

०२. उपबाजार-

मिरजगांव येथे उपबाजार ही मा.डायरेक्टर ऑफ मार्केटींग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नोटीफिकेशननूसार अस्तित्वात आलेली आहे. तर राशीन येथे उपबाजार मा. डायरेक्टर ऑफ मार्केटींग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नोटीफिकेशन नुसार अस्तित्वात आली आहे.

०३ कार्यक्षेत्र –

कृषी उत्पन्न बाजार समीतीचे कार्यक्षेत्र (११७) गावांचे आहे. तसेच बाजार समीतीची मिरजगांव व राशीन येथे उपबाजार आहे. समीती कार्यक्षेत्रात ७३ सोसायटी व ९१ ग्रामपंचायती आहेत.

०४ उददेश –

बाजार समीतीचे मुख्य उददेश शेतक-याने उत्पादीत केलेल्या शेती मालास योग्य भाव मिळवून देणे आणि मध्यस्थामार्फत त्यांची फसवणूक होवू नये व याबाबत वांधे निर्माण झाल्यास त्याचा निर्णय त्वरीत देणे, शेतक-यावर अनाधिकृत खर्च आकारला जाऊ नये म्हणून सर्व बाबीवर कडक नियंत्रण ठेवण्यासाठी बाजार समीतीची स्थापना करण्यात आलेली आहे. बाजार समीतीच्या कार्यक्षेत्रात शेती माल नियंत्रणाखाली आले असून बाजार समीतीच्या कार्यक्षेत्रात शेती मालाची खरेदी विक्री होत आहे. कृषी उत्पादनाच्या खरेदी विक्री नियमनाच्या कायद्यानूसार बाजार क्षेत्रात येणा-या सर्व मालाची विक्री उघड लिलावानेच झाली पाहिजे असा कायद्याचा दंडक आहे. तसेच शेतकरी व खरेदीवर यांच्या व्यवहारात घोषीत कृषी उत्पन्नाच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारात (दलालांना) मनाई आहे.

०५ बाजार समीतीचे शक्ती व कर्तव्ये –

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम २९ प्रमाणे खालील शक्ती व कर्तव्ये आहेत.

१. शेतीमाल खरेदी-विक्रीवर देखरेख करणे.
२. शेतक-यांसाठी बाजारात सोयी उपलब्ध करणे.
३. बाजारात येणा-या लोकांच्या प्रवेशाचे आणि वाहनाच्या वाहतुकीचे (विनियमन करणे)
४. व्यापार करण्यासाठी म्हणून जे लोक बाजारात प्रवेश करतील त्या लोकांच्या वागणूकीवर देखरेख ठेवणे.
५. लायसेन्स देणे, त्याचे नूतनीकरण करणे, ते नाकारणे, निलंबित करणे किंवा रदद करणे.
६. बाजार क्षेत्रामधील बाजारात प्रवेश देणे व बाजाराचा वापर करण्या संबंधात शर्ती घालणे यासह बाजार सुस्थितीत ठेवणे व त्याची व्यवस्था पाहणे.

७. बाजारात कृषी उत्पन्नाच्या खरेदी विक्रीसाठी आवश्यक सुविधांची तरतूद करणे.

८. अधिसूचीत कृषी उत्पन्नाच्या लिलावाचे विनियमन करणे व त्यावर देखरेख ठेवणे.

९. अनुसूचित कृषी उत्पन्नाची विक्री, त्याचे मोजमाप करणे आणि त्याच्या खरेदी विक्रीशी संबंधीत इतर सर्व बाबी या विहीत पध्दतीने करणे त्याची अंमलबजावणी करणे आणि त्या कार्यान्वीत करणे किंवा रदद करणे या गोष्टींचे नियमन करणे.

१०. शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात आलेल्या किमान आधार किंमतीपेक्षा कमी किंमतीत खरेदी व विक्री करण्यास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करणे.

११. संचालकास जरुर असेल त्यानूसार पिके, त्यांची आकडेवारी व बाजार वृत्त माहीतीसह अधिसूचित उत्पन्नाचे उत्पादन, विक्री, साठवण व त्यावर प्रक्रिया करणे त्यांच्या किंमती व त्यांची ने-आण यासंबंधी माहिती गोळा करणे किंवा ठेवणे तिचा प्रसार करणे व ती पुरवणे.

१२. बाजार क्षेत्रामध्ये आणण्यात येणारे किंवा विक्री करण्यात येणारी प्राणी, गुरेढोरे, पक्षी इत्यादीच्या बाबतीत पशुरोग तज्ञाकडून (स्वास्थ्य) पात्रता प्रमाणपत्र मिळविण्याची व्यवस्था करणे.

१३. बाजार समीतीच्या माध्यमातून बाजार क्षेत्रातील नियमनाचे फायदे, व्यवहारांची पध्दती व तेथे पुरविण्यात आलेल्या सुविधांची माहिती देणे.

१४. कृषी उत्पन्नाची खरेदी विक्री आणि तिला सहाय्यभूत अशा सर्व बाबींशी संबंधीत असलेल्या कोणत्याही प्रकारच्या व्यवहारामधून उद्‌भवणा-या विवादांच्या बाबतीत समझोता करण्यासाठी तरतूद करणे.

१५. कलम १२ च्या तरतुदीस अधीन राहून कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता संपादन करणे, धारण करणे किंवा तिचा विनीयोग करणे.

१६. कोणताही दावा, खटला, वाद, कार्यवाही, अर्ज किंवा लवाद दाखल करणे किंवा त्या संबंधात बचाव करणे आणि असा दावा, वाद, कार्यवाही, अर्ज किंवा लवाद यांच्या बाबतीत तडजोड करणे.

१७. बाजार समीतीच्या निवडणूकी घेण्यासाठी व्यवस्था करणे.

१८. बाजारात वखार व खरेदी विक्री यांच्या संबंधातील सुविधा पुरविण्यासाठी संचालकाची मान्यता मिळविण्याच्या अधीन राहुन राज्य व केंद्र सरकार किंवा कोणतीही वित्त व्यवस्था संस्था यांच्याकडून कर्ज, अर्थसहाय्य, आर्थिक मदत मिळविणे.

१९. राज्य खरेदी विक्री मंडळाच्या मान्यतेस अधीन राहुन अर्थसंकल्प तयार करणे, पुरक अर्थसंकल्प तयार करणे, अर्थसंकल्पात पुनर्विनियोजन करणे व त्यानुसार खर्च करणे.

२०. ज्याच्या आधारे वजने व मापे यांची तपासणी करता येईल अशी प्रमाणे वजने व मापे यांचा एक संच बाजारात ठेवणे.

२१. बाजार क्षेत्रात वापरात असलेले तराजू, मापे व वजने यांची तसेच लायसन्स धारकांनी विहीत करण्यात येईल अशा पध्दतीने ठेवलेली लेखा पुस्तके व इतर दस्तऐवज यांची तपासणी व पडताळणी करणे.

२२. या अधिनियमाच्या तरतूदी, निवृत्तीवेतन, रजाभत्ता, उपदाने, अनुकंपा भत्ता व निवृत्तीवेतन किंवा भविष्य निर्वाह निधी यांमधील अंशदाने यांच्या रकमा देणे.

२३. बाजार समीतीने नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचा-यांना विहीत करण्यात आलेल्या पध्दतीने वेतन व इतर वित्तलब्धी, निवृत्तीवेतन, रजाभत्ता, उपदाने, अनुकंपा भत्ता व निवृत्तीवेतन किंवा भविष्य निर्वाह निधी यांमधील अंशदाने यांच्या रकमा देणे.

२४. कलम ५२ मध्ये तरतूद केल्यानूसार अधिनियम, नियम व उपविधी यांच्या तरतुदींचा भंग केल्यामुळे खटला दाखल करणे व अपराध आपापसात मिटविणे.

२५. बाजार क्षेत्रामध्ये साठवण व वखारविषयक सुविधा पुरविणे.

२६. राज्य शासन, राज्य खरेदी विक्री मंडळ किंवा संचालक यांच्या पूर्वसंमतीने कृषी विषयक खरेदी विक्रीच्या नियमनात वाढ करण्याच्या दृष्टीने हितावह असलेला इतर कोणताही कार्यक्रम हाती घेणे.

तरी वरील नमूद केलेल्या शक्ती व कर्तव्याचा वापर पूर्णपणे करण्यात यावा.

०६ कृषी उत्पन्न बाजार समीतीने चांगले राबविलेले उपक्रम-

१. कृषी उत्पन्न बाजार समीतीस शासनाने पुरविलेले संगणक कार्यालयात बसवून त्यास इंटरनेटचे कनेक्शन देऊन महाराष्ट्रातील प्रमुख बाजार पेठेतील बाजार भाव मागवून कार्यक्षेत्रातील शेतक-यांसाठी प्रसिध्द करण्याची सोय उपलब्ध करुन दिलेली आहे.

२. कार्यक्षेत्रातील शेतक-यांचा माल साठविण्यासाठी सेलहॉलची व्यवस्था करुन दिलेली आहे.

३. बाजार समीतीच्या मुख्य प्रवेदव्दारावर कमान उभारुन कमानीला लोखंडी गेट बसवून बाजार आवारातील सुरक्षितता राखण्याचे प्रयत्न केलेले आहेत. तसेच कमानीवर सुशोभीत करुन बाजार समीतीचे नावास प्रभावीपणे प्रसिध्द केलेले आहे. तसेच संपूर्ण आवारास संरक्षक भिंत बांधकाम केलेले आहे. तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसविलेले आहेत.

४. बाजार आवारात पाणी पुरवठा व लाईटची व्यवस्था तसेच अंतर्गत रस्ते यांची व्यवस्था केलेली आहे.

५. तपासणी कालावधीमध्ये बाजार फी व सुपरव्हिजन फी वसुलीचे प्रमाण समाधानकारक आहे, तपासणी कालावधीत वाढ झालेली आहे मात्र मागील कालावधीतील मोठयाप्रमाणातील तूट भरून नगण्य तूट राहिलेली आहे.

०७. शेतमाल तारण योजना-

महाराष्ट्र शासनाने शेतक-यांच्या शेतमालावर शेतमाल तारण योजना बाजार समीती व पणन महासंघामार्फत शेतक-यांसाठी लागू केली असून बाजार समीतीने संचालक मंडळ सभा दिनांक १८.११.२०१९ ठराव क्रमांक ५ नूसार विषय घेतलेला आहे. सदर बाबी कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांचे पत्र क्रमांक कृपमं/बास/शेताकयो/१९-२०/अंमलबजावणी/१७८६/२०१९ दिनांक ५.९.२०१९ नुसार बाजार समितीस कळविलेले आहे. तसेच परिपत्रक क्रमांक कृपमं/बास/शेताकयो/अग्रीम/२०१९-२०/२१११/२०१९ दिनांक ०४.१०.२०१९ बाबत अग्रीमाबाबत नमूद आहे. सदर पत्राची नोंद संचालक मंडळ सभेत घेण्यात आली आंहे. रुपये ५.०० लाख अग्रीम मागणी पणन मंडळाकडे करण्याचे ठरले. शेतक-यांची मागणी नाही असे ठरावात नमूद केलेले आहे. त्यामुळे सदर योजना राबविण्यात आलेली नाही. मात्र याबाबत कार्यक्षेत्रातील गावामध्ये योग्य प्रचार प्रसिध्दी करुन शेतमाल तारण योजना राबवून यशस्वी करण्यासाठी बाजार समितीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

विभाग - अ

०१ समितीकडील जमीन मालमत्ता :-

बाजार समितीने धारण केलेल्या जमिनीचा तपशिल तक्त्यामध्ये नमूद केलेला आहे.

अ क्र	तपशील	गट क्रमांक	जमीन क्षेत्र	
			हेक्टर	आर
१	कर्जत मुख्य बाजार	१२	२	८१
		१९	०	२०
२	मिरजगांव उपबाजार	१९९	२	८८
		२००	२	८४
३	राशीन उपबाजार	१६४४/२	०	८४
		१६५२/२	१	५८
		१६४४/२	३	२०

०२.भविष्य निर्वाह निधी-

दिनांक ३१.०३.२०२५ अखेर खात्यात रु. ११२८८३८६/- इतकी रक्कम जमा आहे. सदर निधीची गुंतवणूक स्वतंत्र खात्यात न गुंतविता ती व्यवहारात आहे. सदर गुंतवणूक ही स्वतंत्र खात्यात करण्यात यावी. समीतीने भविष्य निर्वाह निधीची रक्कम ही बिनव्याजी वापरलेली दिसून येते. त्यामुळे कर्मचा-यांना सेवानिवृत्तीनंतर रक्कम मिळण्यास अडचण येऊ शकते. भविष्यात याबाबत काही वाद उदभवल्यास त्यास समीती व्यवस्थापन व सचिव हे जबाबदार राहतील यांची नोंद घ्यावी. कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीबाबत स्वतंत्र आर्थिक पत्रके तयार करण्यात यावीत. कर्मचा-यांना त्यांच्या भविष्य निर्वाह निधीचे विवरणपत्र दरवर्षी देण्यात येऊन त्यात व्याज आकारणी दर्शविण्यात यावी व सदर विवरणपत्र दिल्याबाबत त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी. कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधी अग्रीम जो देण्यात आलेला आहे तो ३६ मासिक हप्त्यांमध्ये वसूल करण्यात यावा.

०३.अंशदान (PENSION CONTRIBUTION):-

कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधी हा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे संचलीत कर्मचारी सेवानिवृत्ती वेतन योजना यांच्याकडे कर्मचा-यांचा १२ टक्के प्रमाणे समीती हिस्सा आहे. तपासणी कालावधीत समितीने त्यांच्या हिश्यांचा भरणा भ.नि.निधी नाशिक येथे केलेला आहे तथापी समीतीने त्यांच्याकडे सुरवातीपासून वर्गणी जमा केलेली नाही. समीतीने अंशदानाची स्वतंत्रपणे तरतूद करणे आवश्यक असताना ती केलेली नाही. तरी अंशदान न भरल्यास भविष्यात कर्मचा-यांना निवृत्तीवेतन मिळण्यात अडचण येऊ शकते. तरी स्वतंत्रपणे रक्कम नमूद करुन ती रक्कम त्वरीत भरणा करण्याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

०४.मार्केट सेस व सुपरविजन फी येणे तरतूदीबाबत:-

दिनांक ३१.३.२०२५ अखेर बाजार समितीने उपबाजार यांच्याकडून मार्केट फी (भूसार) रु. १०,००,०००/- बाजार समिती भाजीपाला फी रु. ४,६५,७००/- इतकी येणे दर्शविलेली आहे. तपासणी कालावधीत मुख्यालय व उपबाजार यांच्या आपसांतील येणे-देणे रक्कमेत फरक असून सदर फरक मागील कालावधीतील आहे. समितीने उपबाजार व मुख्यालयाचे ताळमेळ पत्रक तयार केले नाही. बाजार समितीने ताळमेळ तयार करुन सुपरविजन फी खाती जमा घेवून येणे तरतूद दर्शविणे आवश्यक होते. मात्र बाजार समितीने तसे केलेले दिसून येत नाही.

भाग-ब

०१.परवाना धारकांची संख्या दर्शविणारा तक्ता - २०२४-२५

क्र	अनुज्ञप्ती प्रकार	संख्या		दर		एकुण रक्कम
		नुतनीकरण	नवीन	नुतनीकरण	नवीन	
१	आडत्या	५०	१०	२७००	३०००	८२९००
२	अ वर्ग	४५	२५	२७००	३०००	६५५००
३	ब वर्ग	२९४	३६	१३५०	१५००	१५०३००
४	तोलाईदार	१४	०	१८०	२००	१२६०
५	हमाल	१७५	४१	२७०	३००	१९८५०
६	टपवाला	७	०	१८०	२००	६३०
	एकूण एकत्रित					**३२०४४०**
१	आडत्या	१९	१०	९००	१०००	२७१००
२	अ वर्ग	२९	१०	९००	१०००	३६१००
३	ब वर्ग	२२२	३०	४५०	५००	११४९००
४	तोलाईदार	६	०	९०	१००	५४०
५	हमाल	९०	२४	९०	१००	१०५००
६	टपवाला	३	०	९०	१००	२७०
	मुख्यालय					**१८९४१०**
१	आडत्या	३१	०	१८००	२०००	५५८००
२	अ वर्ग	९	०	९००	१०००	८१००
३	ब वर्ग	११	०	४५०	५००	४९५०
४	तोलाईदार	८	०	९०	१००	७२०
५	हमाल	२३	०	९०	१००	२०७०
६	टपवाला	४	०	९०	१००	३६०
	मिरजगावं	**८६**	**०**			**७२०००**
१	आडत्या	०	०	०	०	०
२	अ वर्ग	७	१५	९००	१०००	२१३००
३	ब वर्ग	६१	६	४५०	५००	३०४५०
४	तोलाईदार	०	०	०	०	०
५	हमाल	६२	१७	९०	१००	७२८०
६	टपवाला		०	०	०	०
	राशिन	**१३०**				**५९०३०**

लेखापरिक्षण कालावधीत बाजार समीतीने महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ७ नुसार अनुज्ञप्ती दिलेल्या आहेत. तपासणी कांळात नवीन अनुज्ञप्तीसाठी अर्ज प्राप्त झालेले असून त्यांना अनुज्ञप्ती दिलेली आहे. परंतू समीतीकडे सदर अर्ज कधी प्राप्त झाले याबाबत नोंद केलेली नाही. तसेच त्यांच्याकडून आवश्यक ते कागदपत्रे जसे बॅन्क गॅरंटी/पतदार प्रमाणपत्र/रोख तारणबाबतचे पुरावे/कागदपत्रे, चांगल्या वागणुकीबाबतचे

दोन इसमांचे दाखले, परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ते मुद्रांकित केलेले करारनाम्याची प्रत, अर्जदाराच्या व्यवसायाच्या ठिकाणच्या पत्त्याचा पुरावा, निवासाच्या ठिकाणचा पुरावा हे कागदपत्रे उपविधीमध्ये नमूद केलेले असताना अनुज्ञप्ती देताना घेतलेले आहेत. तसेच ज्या अनुज्ञप्तींचे नुतनीकरण केलेले नाही त्या बाबतची सदर अर्ज समीतीकडे कधी प्राप्त झाले आहेत त्याबाबत नोंद रजिस्टरला केलेली नाही ती करण्यात यावी. तसेच सदर त्यावर संबंधितांना त्यांची अनुज्ञप्तीचे नुतनीकरण केल्याबाबत अर्जावर ठराव क्रमांक व दिनांक नमूद करुन मंजूरीबाबत सही करण्यात यावी. व्यापारी अनुज्ञप्तीबाबत व नवीन आडत्या व दलाल यांना अनुज्ञप्तीसाठी वजन मापाची साधने असल्याबाबत घोषणापत्र घेतलेले नाही असे किमान १०० किलोग्राम वजन करता येईल अशी प्रमाणित वजनाची साधने व साहित्य/प्रमाणीत वजनकाटे, एक ग्रॅम पासून १०० किलोग्रामपर्यंत वजन करण्याची सर्व वजने/इलेक्ट्रॉनिक वजनकाटे व द्रव पदार्थांच्या वजनाकरीता वापरावयाची प्रमाणित साधने व साहित्य याशिवाय हमालांसाठी शारीरीक क्षमतेबाबतचे प्रमाणपत्र घेतलेले आहेत. ते घेण्यात आल्यानंतरच अनुज्ञप्ती देण्यात यावी. महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) नियम १९६७ चे नियम ६(५)(अ) नूसार अनुज्ञप्ती किंवा असलेल्या अनुज्ञप्तीचे नुतनीकरणाचा अर्ज मिळाल्यावर त्यावर अर्ज मिळाल्याची तारीख घालण्यात येईल व विहीत केलेल्या नोंदवहीत त्याची नोंद करण्यात येईल असे नमूद आहे पंरतू अर्ज कधी प्राप्त झाला त्याबाबत अर्जावर नोंद करण्यात आलेली नाही. तरी याबाबत पूर्तता करण्यात यावी.

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) नियम १९६७ चे नियम ६(२)(ब) नुसार अनुज्ञप्तीचे नवीनीकरण करण्याचे वेळी अनुज्ञप्ती धारकाने लगतच्या गेल्या वर्षात किती व्यापार केला आहे याचे निवेदन व त्या निवेदनात बाजार समीतीला देय असलेले किंवा देणे दिले आहे, किती बाकी आहे याची माहिती नमूद केली पाहिजे परंतू अनुज्ञप्ती नुतनीकरण प्रकरणात अशी माहिती घेण्यात आलेली नसताना देखील अनुज्ञप्तीचे नुतनीकरण करण्यात आलेले आहे. याबाबत योग्य ती पूर्तता करण्यात यावी.

व्यापारी अनुज्ञप्ती नुतनीकरणाचे अर्ज परिशिष्ट क्रमांक ११ मध्ये नमूद केलेल्या नमून्यात घेतलेले नाहीत. परंतू अनुज्ञप्ती नुतनीकरणावेळी उपविधी मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदर अर्जातच कोणते कागदपत्रे जोडावयाची ते नमूद केलेले आहे. त्यानुसार अनुज्ञप्ती नुतनीकरणावेळी संबंधितांकडून मुळ अनुज्ञप्तीची प्रत, गतवर्षातील केलेल्या व्यवहाराचा तपशील ही कागदपत्रे न घेताच अनुज्ञप्तीचे नूतनीकरण केलेले आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन)नियम १९६७ मधील नियम ११६(१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे अडत्या/व्यापारी किंवा दलाल म्हणून काम करण्यासाठी दिलेल्या अनुज्ञप्तीचे नोंदणी पुस्तक हे नमुना क्रमांक २१ मध्ये ठेवणे आवश्यक असताना ते नमूना क्रमांक २० मध्ये ठेवलेले आहे. सन २०२४-२५ मध्ये ज्या अनुज्ञप्तीचे नुतनीकरण केले किंवा नवीन अनुज्ञप्ती दिलेल्या आहेत त्यापासून बाजार समीतीस रुपये ३,२०,४४०/- प्राप्त झालेले आहेत.

मा पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक पणन ५/कृउबास/इ ट्रेर्डीग ट्रान्झॅक्शन/५९४/२०१८ दिनांक १२.०२.२०१८ नुसार शेतमाल खरेदी केल्यानंतर त्याबददल चुकारे वेळीच अदा करण्यासाठी व शेतक-यांच्या हितासाठी व विक्री केलेल्या शेतमालाचा मोबदला तत्काळ शेतक-यास, माथाडी कामगारांना त्यांचे हमाली व तोलाई लगेच बॅन्क खात्यात जमा होईल या दृष्टीने काळजी म्हणून सध्याच्या अनुज्ञप्ती धारकांना व यापुढे अनुज्ञप्ती देताना बँक गॅरंटी ऐवजी कॅश क्रेडीट लिमीट घेणे आवश्यक आहे. सदर प्रकल्प पायलट प्रकल्प आहे. तरी या बाबी योग्य ती दक्षता घेण्यात यावी व सदर सूचनेनुसार कार्यवाही करावी.

०२.बाजार समीती गाळे –

समीतीकडे मिरजगांव उपबाजारात ६ गाळे व शॉपींग कॉम्प्लेक्स मध्ये ६ गाळे असे एकुण १२ गाळे आहेत तर उपबाजार मिरजगांव येथील भुखंड भाडे तत्वावर व्यापा-यांना दिलेले असून त्यावर व्यापा-यांनी बांधकाम केलेले आहे. राशीन उपबाजारात १४ गाळे आहे. तसेच भुखंड देखील वाटप नाही. कर्जत मुख्य बाजार आवारात गाळे नाहीत. परंतू व्यापा-यांना भुखंड वाटप केलेले असून व्यापा-यांनी त्यावर स्वतः बांधकाम करुन घेतले आहे. समीतीने व्यापा-यांना जे भुखंड व गाळे वाटप केलेले आहेत त्याबाबत करारनामे पहावयास मिळालेले नाहीत. समीतीने गाळे भुखंड व्यापा-यांना दिलेले आहेत त्या दिलेल्या गाळयांमध्ये व भुखंडामध्ये नियमबाहय पोटभाडेकरी ठेवू नये. ठेवले असल्यास ते गाळे व भुखंड रिकामे करुन घेण्याबाबत दक्षता घ्यावी.

तपासणी मुदतीत करारनामे दप्तरी पहावयास मिळाले नाहीत. सदर करारनामे प्रत संस्थेच्या दप्तरी असणे आवश्यक आहे. मागील लेखापरिक्षण अहवालात या बाबी शेरे नमूद केलेले असतानादेखील त्याची पूर्तता केलेली नाही. भविष्यात गाळेधारक तसेच भूखंडधारक व बाजार समीतीत वाद उद्भवल्यास कराराअभावी समीतीला तोशीष बसल्यास त्यास संचालक मंडळ व सचिव जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. तसेच व्यापा-यांकडून डिपॉझिटची रक्कम घेण्याबाबत विचार करावा जेणेकरुन समीतीस उत्पन्नाचे साधन तयार होईल. थकीत भाडे रक्कम भरणार नाहीत त्यांच्या विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. मासीक भाडे हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ठरवून घेणे आवश्यक आहे. गाळा हस्तांतरण करताना हस्तांतरण फी घेण्यात आलेली आहे. सर्व रक्कम वसूल केल्यानंतरच गाळा हस्तांतरण करण्यात यावे.

०३.अंदाजपत्रक –

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ३८(१) नुसार जमा खर्चाचे वार्षिक, सुधारीत किंवा पुरवणी अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यात येतील असे नमूद आहे. तर कलम ३८(२) नुसार प्रत्येक बाजार समीती प्रत्येक वर्षी विहीत केलेल्या तारखेपूर्वी राज्य खरेदी विक्री मंडळाकडे अर्थसंकल्प सादर करील. राज्य खरेदी विक्री मंडळ तो मिळाल्यापासून २ महिन्याच्या आत यथास्थिती फेरबदल करुन किंवा फेरबदल न करता अर्थसंकल्प मंजूर करील. जर ती मिळाल्यापासून दोन महिन्याच्या आत त्याबददल मंडळाकडून मान्यता कळविण्यात आली नाही तर किंवा अन्यथा अर्थसंकल्पाविषयी काहीही कळविण्यात आले नाही तर अर्थसंकल्प कोणताही फेरबदल न होता मंजूर झाल्याचे मानण्यात येईल. तसेच कलम ३८(३) नुसार कोणत्याही अन्य अर्थसंकल्पप शीर्षाखाली बचत म्हणून पुनर्विनियोजनाव्दारे खर्च भागविणे शक्य असेल ते खेरीज करुन मंजूर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेली नसल्यास कोणत्याही बाबीवर बाजार समीतीकडे खर्च करण्यात येणार नाही. तसेच कलम ३८(४) मध्ये असे नमूद आहे की बाजार समीती ज्या वर्षासाठी अर्थसंकल्प मंजूर झाला असेल त्या वर्षाच्या कोणत्याही कालावधीमध्ये सुधारणा करु शकेल किंवा पुरवणी अर्थसंकल्प सादर करु शकेल आणि जणू काही तो मुळ अर्थसंकल्प आहे असे मानून त्याच पध्दतीप्रमाणे तो मंजूर करु शकेल. तसेच महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन)नियम १९६७ मध्ये नियम ११२ मध्ये नमूद केलेले आहे त्यानूसार नियम ११२(१) नुसार बाजार समीती जानेवारी महिन्यामध्ये आगामी वर्षाकरीताचा उत्पन्नाचा व खर्चाचा अर्थसंकल्प तयार करील. ती कलम ३९-अ नुसार संस्थापित झालेल्या राज्य कृषी उत्पन्न खरेदी विक्री मंडळानेविहीत केलेल्या नमुन्यात तयार करण्यात येईल. हे अंदाजपत्रक मंडळाला किंवा या संबंधात प्राधिकृत केलेल्या अधिका-याला ३१ जानेवारी नंतरच्या नाही अशा तारखेपूर्वी मान्येतेसाठी पाठविण्यात आले पाहिजेत. तसेच नियम

०७.बाजार समित्यांची उपसमीती

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व निनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३० नुसार बाजार समीतीला (मा संचालक किंवा याबाबतीत त्यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-याची मान्यता घेऊन समीतीने स्विकृत करुन घेतलेल्या कोणत्याही व्यक्ती धरुन) आपल्या सदस्यांपैकी एक किंवा अधिक सदस्यांची एक उपसीमीती किंवा अधिक उपसमीत्या नेमता येतील तसेच तिला योग्य वाटतील अशा आपल्या शक्ती किंवा कर्तव्ये अशा उपसमीतीकडे प्रत्यायुक्त करता येतील अशी तरतूद आहे.

मा पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी परिपत्रक क्रमांक सी एम आर/आर/उपविधी/ ५ पणन दिनांक १७.०१.१९८३ नुसार बाजार समीतीत वांधा उपसमीती, सेवक उपसमीती, अनुज्ञप्ती उपसमीती बांधकाम उपसमीती (नियम व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३० नुसार नेमता येऊ शकतात त्यानुसार नमुनेदार उपविधीत सदर नमूद उपसमीत्यांची तरतूद केलेली आहे.

०८. संचालक मंडळ सभा कामकाज :-

तपासणी कालावधीत समितीचे सभापती **श्री. काकासाहेब लक्ष्मण तापकीर** व उपसभापती **श्री अभय पांडुरंग पाटील** यांनी संचालक मंडळ यांच्या मदतीने बाजार समितीचा कारभार केला असल्याचे इतिवृत्तांनुसार दिसून येते. त्यातील महत्वाच्या ठरावांचा संक्षिप्त तपशिल पुढील प्रमाणे.

सभावृत्तांत:- संचालक मंडळ सभा

दि.०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ या आर्थिक वर्षात संचालक मंडळ यांच्या एकूण ०८ मासिक सभा झालेल्या आहेत.त्यातील महत्वाचे ठराव खालीलप्रमाणे नमूद केलेले आहेत.

१. संचालक मंडळ सभा दि. १५.०५.२०२४

सदर सभेस खालील संचालक गैरहजर आहेत.

१) अ. क्र. ३ मंगेश रावसाहेब जगताप
२) अ. क्र. ५ गुलाबराव रामचंद्र तनपुरे
३) अ. क्र. १६ प्रफुल्ल पंढरीनाथ नेवसे
४) अ. क्र. १८ बापूसाहेब प्रभाकर नेटके

विषय नं. २ - माहे मार्च २०२४ व एप्रिल २०२४ चे मासीक खर्चास मान्यता देणे

ठराव नं. २ - खालीलप्रमाणे अ.क्र. हे इतिवृत्तामधील असून खर्च मोठयाप्रमाणात केला आहे.

अ. क्र	तपशील	कर्जत	मिरजगांव	राशिन	एकूण
६	भेटी समारंभ	१६८८५	२९५०	१२५०	२१०८५
१०	गार्ड देखभाल खर्च	१३६७०	८५००	०	२२१७०
११	प्रचार प्रसिध्दी	३००००	०	०	३००००
१५	सभा खर्च	१३५००	०	०	१३५००
१६	वकील फी	२५०००	०	०	२५०००
१८	छपाई खाते	१७३८००	०	०	१७३८००
एप्रिल २०२४					
११	प्रचार प्रसिध्दी	४५०००	०	०	४५०००
१८	इंजिनिअर फी	१३००००	०	०	१३००००
	एकूण	४४७८५५	११४५०	१२५०	४६०५५५

वरील माहे मार्च २०२४ व एप्रिल २०२४ चे मासीक खर्चास मंजूरीच्या सभेस उपस्थित असलेले सहायक निबंधक सुर्यवंशी साहेब यांनी अवास्तव खर्च संभाळून सदर खर्चात काटकसर करण्यात यावी असे नमूद केल्याचे सदर ठरावावरुन दिसून येते. समितीने खरोखर अवास्तव खर्च केल्याचे निदर्शनास येत असल्याने पुढील कालावधीमध्ये काटकसर करण्याची आवश्यकता आहे.

२. मासिक सभा दि. २४.०६.२०२४

सदर सभेस खालील संचालक गैरहजर आहेत.

१) अ. क्र. ५ गुलाब रामचंद्र तनपुरे

२) अ. क्र. १५ अमोल शिवाजी पाटील

विषय नं. ३ - कर्जत, राशील व मिरजगांव उपबाजार येथील विकास कामकाजाचा आढावा घेणे

ठराव नं. ३ - यामधील ३ मिरजगांव ऑफिस दुरुस्ती, ईस्टीमेट रु. ४८०८१०/- सदरचे काम चालू आहे. त्यामुळे आवश्यक ते प्रमाणे ठेकेदार यांना अॅडव्हान्स देण्यात यावा व काम लवकरात लवकर पुर्ण करण्यात यावे अश्या सुचना सभापती यांनी सदर ठरावात आवश्यकतेनुसार अॅडव्हान्स देण्याचा निर्णय झाला आहे मात्र किती अॅडव्हान्स द्यायचा याचा तपशील नमूद न करता ठराव केला आहे. ते अयोग्य आहे.

यामधील ४ - राशीन उपबाजार प्रवेशद्वार ईस्टीमेट रु. ६३००३५/- सदरचे काम अंतिम टप्यात असून आवश्यकते प्रमाणे ठेकेदार यांचे मागणीनुसार अॅडव्हान्स देण्यात यावे व कार्यपुर्ण करण्यात आल्यानंतर अंतिम बिल देण्यात यावे. याबाबत समितीचचे इजिनिअर वैभव गांगर्डे यांना सुचना देण्यात याव्यात व कामकाज दर्जा चांगला राहिला याबाबत कामावर देखरेख करण्याचे कर्मचारी यांना पण तोंडी सुचना दयाव्यात.

सदर ठरावात देखील आवश्यकतेनुसार अॅडव्हांस देण्याचा निर्णय झाला आहे. मात्र किती अॅडव्हांस देण्यात यावा हे निश्चित नमुद न करता मोघम स्वरुपात नमूद केले आहे ते अयोग्य आहे.

यामधील ६ कर्जत मुख्यालय भुईकाटा ईस्टीमेट रु. ८९१०००/- व भुईकाटा फाउंडेशनचे ईस्टीमेट रक्कम रु. ६४८०६७/ यास सभेत मंजुरी देण्यात आली तसेच सदरचे काम समितीचे इंजि. वैभव गांगर्डे यांचे देखरेखी खाली करण्याचे सर्वानुमते ठरले तसेच कामासाठी आवश्यकत अॅडव्हान्स संबंधितांना देण्याचा निर्ण घेण्यात आला सदरचे इस्टीमेट कसे आणि कुणी काढले याचा ठरावात उल्लेख केलेला नाही. सदरचे काम वैभव गांगर्डे यांचे कडून करण्याचा निर्णय झाला आहे. त्यामध्ये ठरावा काहीही तपशील आवश्यकता आणि प्रक्रिया नमुद केलेली नाही. त्यामुळे ठराव हा अपुर्ण वाटतो.

सदर ठरावातील ७ प्रमाणे कर्जत मुख्यालय विद्युतीकरण ईस्टीमेट रु. ७११५००/- सुदर्शन इलेक्ट्रीकल्स व इंजि. अहमदनगर यांचे दिनांक ११.०६.२०२४ अन्वये कर्जत मुख्यालयात सर्व स्ट्रीट लाईटचे काम देण्यात आले होते त्याचे रक्कम मिळणेसाठी मागणी केलेली आहे.

सदरचे काम अजून पुर्ण झालेले नाही ते पुर्ण झाल्यानंतर रक्कम उचल केले नुसार देण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

सदरचे इस्टीमेट कसे आले, ते कसे फायनल झाले सर्व स्ट्रीट लाईट देण्याचा निर्णय कधी कोणत्या ठरावाद्वारे झाला या बद्दल ठरावा काहीही उल्लेख केला नाही अशा प्रकारे अपुर्ण माहिती नमुद करुन ठराव करणे उचित नाही.

विषय नं. ४ - आलेल्या पत्रव्यवहाराची नोंद घेणे यामधील

यामधील २ घाजमे ए. एन. लिपिक यांनी दि. २१.०६.२०२४ चे अर्जाद्वारे मुलांचे शिक्षणासाठी रु. ४ लाख भ.नि.नि. वर कर्जमागणी केली आहे.

समिती निर्णय :- रक्कम उपलब्धतेनुसार भ.नि.नि. ॲग्रीम देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

श्री. कदम एस. ई. सचिव यांनी चार चाकी गाडी घेण्यासाठी भ. नि. निधीवर अथवा ॲडव्हान्स रक्कम रु. ५ लाख मागणी केलेली आहे व सदरची परतफेड नियमित पगारातुन करुन देण्यसाठी विनंती केलेली आहे.

समितीचा निर्णय - रक्कम उपलब्धेतनुसार देण्यात यावी असे सर्वानुमते ठरले आहे. समितीकडे भविष्य निर्वाह निधीची रक्कम स्वतंत्रपणे गुंतवलेली असतांना रक्कम उपलब्धेतेनुसार ॲग्रीम देण्याचा निर्णय कसा काय घेतला रक्कम उपलब्ध नसल्याचे कारण काहीही ठरावात नमुद केलेले दिसून येत नाही. कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम समितीने राखुल ठेवणे व स्वतंत्र ठेवणे आवश्यक असते.

३. संचालक मंडळ सभा दि. ०९.०८.२०२४

सदर सभेस खालील संचालक गैरहजर आहेत.

१) अ. क्र. १२ राम प्रभाकर कानगुडे
२) अ. क्र. १७ विजय चंपालाल भंडारी
३) अ. क्र. १८ बापूसाहेब प्रभाकर नेटके

विषय नं. ४ - आलेल्या पत्रव्यवहाराची नोंद घेणे यामधील

यामधील १८ प्रमाणे डॉ. अफरोज पठाण लोकमत कर्जत तालुका प्रतिनिधी यांनी लोकमत वर्धापन दिनानिमीत्त जाहिरात मिळणेबाबत विनंती केली आहे.

अशाप्रकारे शुभेच्छा जाहिराती सन २००० शासन परिपत्रकान्वये देता येत नाहीत हे ज्ञात असतांना संचालक मंडळाने शुभेच्छा जाहिराती दिलेल्या आहेत.

विषय नं. ५ - मा. सभापती साहेब यांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

ठराव नं. ५ - मधील २ ठरावांतर्गत बाजार समितीचे वतीने यापुढे कोणतीही जाहिरात प्रसिध्द देण्यात येऊ नये असे श्रीहर्ष शेवाळे यांनी सूचना मांडली त्यास सर्वानुमते मान्यता दयावी. असे ठरावात नमूद आहे.

४. संचालक मंडळ सभा दि. ३०.०९.२०२४

सदर सभेस खालील संचालक गैरहजर आहेत.

१) अ. क्र. ५ गुलाब रामचंद्र पवार
२) अ. क्र. १२ राम प्रभाकर कानगुडे

५. मासिक सभा दि. २६.१०.२०२४

सदर सभेस खालील संचालक गैरहजर आहेत.

१) अ. क्र १३ बळीराम मारुती यादव

२) अ. क्र. १५ अमोल शिवाजी पाटील

सहायक निबंधक हजर नाहीत.

विषय नं. ४ - आलेल्या पत्रव्यवहाराची नोंद घेणे यामधील

ठराव नं. ४ - यामधील नं. ९ अन्वये श्री गणेश जेवरे न्यूज पेपर एजेंट कर्ज यांनी दि. २०.१२.२०२४ रोजीचे बिल नं. ५७५ रु. २५०००/ व बिल नं. ४८३ दि. २०.०७.२०२४ रक्कम रु. ५५०००/- वर्धापण दिनानिमीत्त संचालक मंडळ जाहिरात देण्यात आली होती त्याचे बिल मागणी केली.

याबाबत सभेमध्ये चर्चा करण्यात यावी यापुढे जाहिरात न देण्याचे ठरले तसेच सदर बिल देणेबाबत सभापती व उपसभापती यांनी त्यांचे स्तरावर निर्ण घेण्याचे ठरले बाबर सभापती यांनी रु. २५०००/- रुपये बिल देण्यात यावे असे ठरले व उर्वरीत बिलाबाबत नंतर निर्णय घेण्यात येईल असे सभापती यांनी सांगितले.

शासनाचे सन २००० चे परिपत्रकान्वये अशा प्रकारच्या शुभेच्छा जाहिराती देता येत नाहीत या रक्कमा मंजुरी देणाऱ्यांकडून वसुल पात्र आहेत.

ठराव नं. ४ - यामधील नं. ११ अन्वये मिरजगांव उपबाजार येथील ऑफिस फर्निचर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला, सदर कामासाठी लागणाऱ्या अंदाजीत खर्च रु. ८ लाखाचे आसपास येणार असल्याचे सभापती यांनी सभेत सांगितले व सदरचे कामासाठी कोटेशन मागीतले असता शिवसृष्टी प्लायवूड ॲण्ड हार्ड वेअर मिरजगांव यांचे दर कमी असल्याने त्यांना देण्याचे ठरले तसचे सदर काम चालु करण्यासाठी आवश्यक ॲडव्हान्स देण्याचे ठरले. तसेच मिरजगांव मध्ये पावसामुळे अंतर्गत रस्ते खुप खराब झाले असल्याने सदरचे रस्ते दुरुस्त करण्यासाठी रस्तेवर खरवड टाकुन मुरुम टाकून जेसीबीच्या सहाय्याने दरुस्त करण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यावर आवश्यक तो खर्च करण्यास सभेमध्ये मंजुरी देण्यात आली.

फर्निचर खरेदीसाठी संचालक मंडळाने इस्टीमेट कोणकडून काढले? यापुर्वीच्या कोणत्याही सभेत असे इस्टमेट घेण्याचा निर्णय झालेला दिसून येत नाही. शिवसृष्टी प्लायवूड ॲण्ड हार्ड वेअर मिरजगांव कडून कोटेशन कसे काय मागवले? प्रचलित निविदा पध्दत अवलंबली नाही. कोणत्याही वर्तमान पत्रात जाहिरात देवून कोटेशन घेतले नाहीत त्याचा तुलनात्मक तक्ता करुन सर्वात कमी दर असणारास काम दिले नाही. जाणीवपूर्वक प्रचलीत पध्दत डावलली दिसून येते.

तसेच रस्ते दुरुस्ती बाबतही इस्टीमेट काढलेले नाही आवश्यक तो खर्च करण्याचा मोघम स्वरुपाचा ठराव केलेला दिसून येतो. तसेच सदरचे काम प्रचलीत निवदा पध्दत अवलंबून करणे आवश्यक होते.

६. संचालक मंडळ सभा दि. १४.१२.२०२४

सदर सभेस खालील संचालक गैरहजर आहेत.

१) अ. क्र. ११ लहू रामभाऊ वतारे

२) अ. क्र. १५ अमोल शिवाजी पाटील

३) अ. क्र. १८ बापूसाहेब प्रभाकर नेटके

विषय नं. २ - माहे ऑक्टोबर २०२४ व नोव्हेंबर २०२४ चे मासीक खर्चास मान्यता देणे

ठराव नं. २ - माहे ऑक्टोबर मध्ये यार्ड देखभाल खर्च जास्त झालेला आहे. मिरजगाव उपबाजारामध्ये रु. ३६०००/- इतका खर्च झालेला आहे माहे नोव्हेंबर कर्जत बाजार समितीत रु. १३९६००/- इतका यार्ड देखभालसाठी खर्च केलेला दिसून येतो सदरचा खर्च हा जास्तीचा वाटतो.

विषय नं. ३ - राशीन उपबाजार शॉपिंग उपबाजार शॉपिंग कॉम्प्लेक्स इमारत कामकाज सुरु करणेबाबत निर्णय घेणे

ठराव नं. ३ - राशीन उपबाजार येथील जनावरे बाजारातील जियोजित शॉपिंग कॉम्पलेक्स गट नं.-- मध्ये उभारण्यासाठी बाजार समितीने महाराष्ट्र शासनाचे ई पोर्टलवर जाहिर निविदा रक्कम रु. २४६७३५४७/- रुपये प्रसिध्द करण्यात आली असे नमूद करुन सविस्तर ठराव केलेला दिसून येतो मात्र या ठरावात गट नं. नमूद केलेला नाही. त्यामुळे नेमके कुटे शॉपिंग कॉम्पलेक्स उभरणार याचा बोध होत नाही. गट नं नमूद न करता ठराव करणे चूकीचे आहे.

७. संचालक मंडळ सभा दि. २५.०१.२०२५

सदर सभेस खालील संचालक गैरहजर आहेत.

१) अ. क्र. २ अभय पांडूरंग पाटील
२) अ. क्र. ३ मंगेश रावसाहेब जगताप
३) अ. क्र. ७ रामदास झुंबर मांडगे
४) अ. क्र. १८ बापूसाहेब प्रभाकर नेटके

विषय नं. ५ - आलेल्या पत्रव्यवहाराची नोंद घेणे यामधील

ठराव नं. ५ - यामधील नं. १३ अन्वये श्री आकाश बाळासाहेब वाघ मिरजगांव यांनी मिरजगांव येथील म्हसोबा मंदिराचे कामकाज चालू करण्यासाठी रु. १००००/- ची अॅडव्हान्स मागणी केलेली आहे त्यास रक्कम देण्यात यावी असा ठराव केला आहे. ठरावत पुढे इजि. वैभव गांगर्डे यांनी सादर केलेले मंदिराचे प्लन व इस्टीमेटला मंजुरी देण्यात आली त्याप्रमाणे आदेश तयार करण्याचे सभापती यांनी आदेश दिल्याचा ठराव केला आहे. सदर मंदिराचे इस्टीमेट किती आहे ते नमूद नाही त्यात मा. पणन संचालक , जिल्हा उपनिबंधक व सहायक निबंधक यांचे पैकी कोणाच्या खर्च मर्यादेत आहे त्याची मंजुरी घेतली किंवा नाही याबाबत ठरावात उल्लेख केलेला नाही. मंजुरी करिता प्रस्ताव सादर केलेला तपासणी वेळी सादर केलेला नाही.

गणेश जेवरे न्यूज पेपर एजेंट कर्जत यांनी दि. २०.१२.२०२४ रोजीचे बिल नं. ५७५ रु. २५०००/ व बिल नं. ४८३ दि. २०.०७.२०२४ रक्कम रु. ५५०००/- वर्धापण दिनानिमीत्त संचालक मंडळ जाहिरात देण्यात आली होती त्याचे बिल मागणी केली.

८. संचालक मंडळ सभा दि. १७.०३.२०२५

सदर सभेस खालील संचालक गैरहजर आहेत.

१) अ. क्र. ३ मंगेश रावसाहेब जगताप
२) अ. क्र. ५ गुलाब रामचंद्र तनपुरे
३) अ. क्र. ११ लहू रामभाऊ वतारे
४) अ. क्र. १२ राम प्रभाकर कानगुडे
५) अ. क्र. १५ अमोल शिवाजी पाटील

सदर सभा ही क्लोज केलेली नाही. भविष्यात इतर सभावृत्तांत पुस्तकात इतरही ठराव नमूद केले जावू शकतात त्यामुळे सभा संपल्यानंतर तात्काळ सभेचे कामकाज बंद करण्याची आवश्यकता आहे.

विषय नं. २ - माहे जानेवारी २०२५ व फेब्रुवारी २०२५ चे मासीक खर्चास मान्यता देणे

ठराव नं. २ - सदर ठरावत प्रसार व प्रसिध्दीसाठी जानेवारी २०२५ महिन्यात रु. ४०३३०/- चा खं तर माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये रु. ५८०००/- इतका खर्च केला आहे आणि त्यास सदर ठरावाद्वारे मंजुरी घेतल्याचे दिसून येते. मात्र सदर ठरावात कारणाचे, कोणत्या कामाची कुठे जाहिरात दिली अशा प्रकारे जाहिरात देण्याचा निर्णय कधी आणि कोणत्या सभेत झाला होता याबाबतचा कोणताही तपशील नतुद न करता मोघम मंजुरी घेतल्याचे दिसते ते अयोग्य आहे.

संचालक मंडळाचे मासिक सभांमधील काही उणिवा:-

१.मासिक सभांना संचालक गैरहजर अथवा रजेवर असल्याबाबत इतिवृत्तामध्ये शेरा नमूद करावे, सलग ३ सभांना संचालक गैरहजर असल्यास मा. पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाकडे कायदेशीर कार्यवाहीस्तव प्रस्ताव सादर करण्याची तरतूद असल्याने कार्यवाही करण्यात यावी.

२. दोष दुरुस्ती सादर करतांना दोषांची संपूर्ण पुर्तता होऊन दोष दुरुस्ती अहवाल सादर करणे आवश्यक असतांना काही दोषांबाबत मोघम दुरुस्त्या करण्यात आल्यामुळे उणिवा कायम आहेत त्यामुळे वारंवार दोषांची पुनरावृत्ती होत आहे. मागील कालावधीतील दोषांची दुरुस्ती करतांना मुख्यालय व उपबाजार याच्या आपसांतील व्यवहारांची अंतर्गत तपासणी करुन सुयोग्य व्यवहार करुन आपसांतील येणी-देणी रक्कमांची दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे.

०९.बाजार समीतीने ठेवावयाची पुस्तके :-

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खेदी विक्री (विकास व विनियमन) नियम १९६७ चे नियम ११६(१) नुसार बाजार समीतीने खालीली प्रमाणे हिशोबाची (लेखे) व नोंदणीची पुस्तके ठेवली पाहिजेत.

१) कॅश बुक (कीर्द-रोखवही) नमुना नं १६
२) जनरल लेजर (जनरल खतावणी) नमुना नं १७
३) इंडिव्हिजल लेजर (वैयक्तीक लेजर खतावणी) नमुना नं १८
४) मार्केट फी चे नोंदणी पुस्तक नमुना क्र १९
५) अनुज्ञप्तीचे नोंदणी पुस्तक नमुना क्र २०
६) आडत्या,व्यापारी किंवा दलाल अनुज्ञप्ती धारकाचे नोंदणीपुस्तक नमुना क्रमांक २१
७) नमुने व हिशोबाच्या पुस्तकाचे नोंदणी पुस्तक नमुना क्रमांक २२
८) स्टेशनरीचे नोंदणी पुस्तक नमुना क्रमांक २३
९) डेडस्टॉक रजीस्टर नमुना नं २४
१०) पगाराचे नोंदणी पुस्तक नमुना क्र २५
११) शासकीय कर्जाचे नोंदणी पुस्तक नमुना क्र २६
१२) मालमत्तेचे नोंदणी पुस्तक नमुना क्र २७

बाजार समीतीने अनुज्ञप्तीचे नोंदणी पुस्तक नमुन्यात ठेवलेले नाही. तसेच नमुना नं २३ नुसार स्टेशनरी नोंदणी पुस्तक, नमुना नं २६ नुसार शासकीय कर्जाचे नोंदणी पुस्तक व नमुना नं २७ नुसार मालमत्तेचे नोंदणी पुस्तक ठेवलेले नाही.तरी नमुन्यात नियमानुसार दर्शविलेली सर्व पुस्तके ठेवण्यात यावीत.

१०.सचिवाची शक्ती व कर्तव्ये :-

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) नियम १९६७ चे नियम १०६ नुसार बाजार समीतीच्या चिटणीस/सचिवाची कामे दिलेली आहेत. त्यानुसार बाजार समीतीचे ठराव अंमलात आणणे, हिशोब ठेवण्यास व सर्व प्रकारची पत्रके वक्तशिरपणे सादर करणे, दुय्यम कर्मचा-यांवर नियंत्रण

ठेवणे ही कार्ये आहेत परंतू सचिवाने अंदाजपत्रक वेळीच सादर करण्याबाबत पूर्तता केलेली आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) नियम १९६७ चे नियम १११ नुसार पासबुक अद्ययावत करुन त्यानुसार व्यवहार करणे आवश्यक आहे. बाजार क्षेत्रात वापरात असलेले तराजू, वजने व मापे यांची तसेच लायसेन्स धारकांनी विहीत नमुन्यात लेखापुस्तके व दस्तऐवजाची किंमती लायसेन्स धारकांची तपासणी केल्याबाबत अहवाल समीतीस सादर केलेला नाही व त्याबाबत तपशील तपावणीच्या वेळी पहावयास मिळाला नाही.

११.आस्थापना विभाग :- कर्मचारी व्यवस्थापन-

अहवाल सालात बाजार समीतीचे दप्तरी कामकाज सचिव श्री सतीष एकनाथ कदम यांनी पाहिलेले असून त्यांनी इतर सेवकांच्या मदतीने कामकाज केले आहे. सचिव श्री सतीष एकनाथ कदम यांच्या सचिव या पदास मान्यता मा.पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक पणन-५/कर्जत/अपिल/११२/१४/१५/५९३ दिनांक १२.२.२०१५ अन्वये सचिव नियुक्ती कायम केलेली असून मा पणन संचालक महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्रमांक पणन -५/कृउबास कर्जत/सचिव नियुक्ती/१४८६/२०१७ दिनांक २१.३.२०१७ अन्वये महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व निनियमन) नियम १९६७ चे नियम १००(५) नुसार मान्यता दिलेली आहे. श्री एस ई कदम हे पॅनल सचिव म्हणून दिनांक १८.३.२०१३ पासून दि. १२.१०.२०२५ पर्यंत कार्यरत होते, तपासणी कालावधीत दि. १२.१०.२०२५ रोजी त्यांचे निधन झाले आहे. तद्नंतर समितीने दि. १५.१०.२०२५ पासून विकास दिनकर तनपूरे नवनिर्वाचीत प्रभारी सचिव यांची नेमणूक केलेली आहे त्यास मा. पणन संचनालय, म. रा. पुणे यांच्या कार्यालयाकडून दि. १७.१२.२०२५ रोजी मंजूरी घेतलेली आहे. सन २०२४-२५ या तपासणी कालावधीचे दप्तर प्रभारी सचिव विकास तनपूरे यांनी सादर केले आहे.

बाजार समीतीस वरील प्रमाणे १९ पदांचे मंजूर स्टाफ पॅटर्न असून त्यास मा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अहमदनगर यांनी आदेश क्रमांक पणन१/कृउबास/कर्जत/सेवक सूची/१२३८६/१९९८ दिनांक ०४.१२.१९९८ नुसार मंजूरी दिलेली आहे.

तपासणी कालावधीमध्ये समितीचे निरीक्षक श्री. सुगंध नवल घोडके हे दि. ३१.१२.२०२४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्याने पुढील कालावधीत सदर पद रिक्त राहिले आहे. त्यात खालील पदे आहेत. दिनांक ३१.०३.२०२५ अखेर मंजूर, भरलेली व रिक्त पदे खालीलप्रमाणे आहेत-

अ क्र	पदाचे नांव	मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे
१	सचिव	१	१	-
२	सहायक सचिव	२	१	१
३	लेखापाल	१	०	१
४	निरीक्षक	१	०	१
५	सुपरवायझर	१	०	१
६	लिपीक	४	२	२
७	नाईक	१	१	-
८	वॉचमन	३	२	१
९	माळी	१	०	१
१०	शिपाई	४	३	१
	एकुण	**१९**	**१०**	**९**

दिनांक ३१.०३.२०२५ अखेर १० पदे कार्यरत आहेत. वरील मंजूर पदापैकी ९ पदे रिक्त असून उर्वरीत सर्व कार्यरत १० कर्मचारी बाजार समीतीच्या सेवेत आहेत. कर्मचा-यांमध्ये जे पदे आहेत त्यात

सरळसेवेची व पदोन्नतीची किती पदे आहेत याबाबतचा तपशील नाही. तपासणी काळात एकाही कर्मचा-याची पदोन्नती झालेली नाही. तसेच नवीन भरती झालेली नाही. एकुण कर्मचा-यांत मा न्यायालयाच्या निर्णयानूसार तसेच शासन आदेशानुसार कर्मचा-यांमधील मागासवर्गीय कर्मचा-यांच्या अनुशेष बाकी राहणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच दिव्यांग कर्मचा-यांचा देखील अनुशेष भरणा करण्याबाबत दक्षता घ्यावी. याशिवाय महिलांचा अनुशेष राहणार नाही याची दक्षता घ्यावी. तरी मा.सहायक आयुक्त (मावक) नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडून बिंदू नामावली अद्ययावत तपासणी करुन घेण्यात यावी व बिंदू नामावलीत नमूद केल्यानूसार आरक्षण पदे भरण्याची दक्षता घेऊन अनुशेष भरणा करण्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा. मा पणन संचालकांच्या मान्यतेने अनुशेष भरणा करण्याबाबत विचार करण्यात यावा. शासन धोरणानुसार अनुकंपा धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत दक्ष रहावे.

मा पणन संचालकांनी आस्थापना खर्चाबाबत जी मर्यादा घालून दिलेली आहे त्यापेक्षा जादा खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी. कायम कर्मचा-यांपैकी कर्मचा-यांकडून जामीन घेतलेले नाहीत. मा उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट पिटीशन क्रमांक ६१४३/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिलेल्या निकालानुसार योग्य ती पूर्तता करण्यात यावी अन्यथा या बाबी समीतीस पूर्तता न केल्यास दंडात्मक कार्यवाहीस सामोरे जावे लागेल.

बाजार समीतीतील कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांची तपासणी केली असता सर्व कर्मचा-यांच्या सेवापुस्तकात प्रपत्र "ओ" नामनिर्देशनाचा नमुना, वैद्यकिय तपासणी अहवाल वगैरे नोंदी अद्ययावत आहेत. सेवा पुस्तकातील सर्व नोंदी अद्ययावत करण्यात याव्यात. भविष्यात काही अडचणी निर्माण त्यास सचिव जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

मा पणन संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी त्यांचे परिपत्रक क्रमांक पणन-५/कउबास/ सुधारीत वेतन आयोग/३४६२/०९ दिनांक ०३.११.२०१९ नुसार सुधारीत वेतन श्रेणी व आस्थापना खर्च कळविलेला असून त्यानुसार वेतनश्रेणी लागू राहील असे कळविलेले आहे. राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समीतीच्या कर्मचा-यांना शासकीय कर्मचारी व अधिकारी याच्या प्रमाणे वेतन व भत्ते लागू करण्याबाबत महाराष्ट्र शासनाचे सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे परिपत्रक क्रमांक कृउबा/ ०७१४/प्रक्र१३७/२१-स दिनांक २८.८.२०१४ पासून आस्थापना खर्चात मर्यादेत शासकीय कर्मचा-यांप्रमाणे वेतन व भत्ते अदा करण्यास मान्यता दिलेली आहे. याशिवाय महाराष्ट्र शासनाचे सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे परिपत्रक क्रमांक कृउबास-०८१४/प्र क्र १४४/२१-स दिनांक २८.८.२०१४ नुसार अ वर्गवारीत असलेल्या बाजार समीत्या ज्यांचे उत्पन्न रु १ कोटीवर आहे त्यांना आस्थापना खर्च ४५ टक्के व ब वर्गवारीत असलेल्या बाजार समित्या ज्यांचे उत्पन्न रु ५० लाखांचे वर व १ कोटी पर्यंत ओ त्यांना आस्थापना खर्च ५० टक्के मर्यादा मंजूर करुन पूर्वीच्या खचाच्या मर्यादेत १० टक्के वाढ करुन सदर सुधारीत आस्थापना खर्च मर्यादा मंजूर केलेली आहे. मा पणन संचालकांनी आस्थापना खर्चाबाबत जी मर्यादा घालून दिलेली आहे त्यापेक्षा जादा खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी. सन २०२४-२५ या कालावधीत एकुण आस्थापना खर्च रुपये ९४६४४३८/- एवढा झाला असून एकुण उत्पन्न रु २०२९२२२९/- एवढे असून आस्थापना खर्चाचे उत्पन्नाशी प्रमाण हे ४६.६४ टक्के एवढे आहे. बाजार समीतीस तिच्या वर्गवारीनूसार आस्थापना खर्च हा ४५ टक्के असावा असे नमूद केलेले आहे. तरी याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी. मा पणन संचालकांच्या परिपत्रकानूसार रु १ कोटीवर उत्पन्न गटात असल्यामुळे समीती ही अ वर्गात आहे. आस्थापना खर्च विहीत मर्यादेतच राहील याबाबत योग्य ती दक्षता संचालक मंडळाने घ्यावी. बाजार समितीने तात्पुरते कर्मचारी भरती करु नयेत अशा सुचना असतांना देखील बाजार समितीने त्याचे उल्लंघन केलेले आहे. तरी आस्थापना खर्च मर्यादा निश्चित करुनच कर्मचारी भरती बाबतवा निर्णय घेणे आवश्यक आहे.

- - महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) नियम १९६७ मधील नियम १०५ नुसार बाजार समीतीने ज्यांच्याकडे पैसे आणि मालमत्ता यांचे व्यवहार सोपविण्यात येईल अशा आपल्या अधिका-याकडून आणि सेवाकाकडून उपविधीमध्ये निर्दीष्ट करण्यात येईल अशा रितीने व अशा मर्यादेपर्यंत तारण घेतले पाहिजे असे नमूद केलेले आहे त्यानूसार समीतीने तारण घेतलेले नाही.

बाजार समीतीतील कर्मचा-यांना पदोन्नती देण्यापूर्वी बिंदू नामावली ही मा आयुक्त मागासवर्ग कक्ष, नाशिक यांचेकडून तपासून घेऊन व सेवानियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करावी व त्यास मा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांची मंजूरी घेऊनच देण्याबाबत पदसिध्द संचालक तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत यांनी दिलेल्या निर्देशाची नोंद घेण्यात यावी.

बाजार समीतीच्या कर्मचा-यांनी ७ व्या वेतन आयोगानूसार जानेवारी २०१६ पासून वेतन आयोग लागू करण्याची मागणी केली. त्याबाबत संचालक मंडळ सभा दिनांक २२.७.२०१९ ठराव क्रमांक ७ नुसार मा पणन संचालकांच्या आदेशानूसार मंजूर करण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे तपासणी कालावधीमध्ये सुधारित वेतननिश्चिती करुन वेतन अदा केलेले आहे.

कर्मचा-याची सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात यावी. तसेच कर्मचा-यांना सेवाजेष्ठतेनुसार व पद उपलब्धतेनूसार मंजूरीनुसार पदोन्नती देण्यात यावी. कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिखाणाची पध्दती अवलंबविण्यात यावी. एकुण मंजूर पदापैकी रिक्त असलेल्या पदांबाबत मान्यता घेऊन पदोन्नतीबाबत योग्य तो निर्णय घेण्यात यावा. बाजार समीतीत कार्यरत असलेले श्री आण्णासाहेब शेलार लिपीक यांच्या मुळ पदास खात्याची मान्यता नाही तरी ती घेण्यात यावी. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी १०९७/प्र.क.१०९७/१६-ब दिनांक २१.९.१९९८ नूसार एकाकी पद मंजूर असलेल्या संवर्ग पदास आरक्षण लागू नाही. बाजार समीतीतील कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीचे स्वतंत्र खाते बॅन्केत उघडून त्यात रक्कम भरणा करावी. कर्मचा-यांचे पगार वेळीच करुन त्यांनी जे पतसंस्थेचे कर्ज घेतलेले आहे त्याची कपात करुन त्वरीत पतसंस्थेला कर्जाची रक्कम भरणा करण्याची दक्षता घ्यावी. वेळीच पगार न केल्यामुळे भविष्यात काही वाद निर्माण झाल्यास त्यास समीतीचे संचालक मंडळ व सचिव जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

१२.जनावरे बाजार :-

राशीन उपबाजार येथे दर मंगळवारी तर मिरजगांव उपबाजारात दर बुधवारी जनावरांचा बाजार भरतो. यात शेळी, मेंढी, संकरीत गायी, म्हैस, बैल या जनावरांचा बाजार भरतो. बाजारात येणा-या जनावरांवरील शुल्क बाजार समीती वसूल करते. जनावरांच्या किंमतीवर शेकडा १.०५ पैसे या दराने म्हणजे रु १ प्रमाणे बाजारशुल्क व रु ०.०५ पैसे प्रमाणे देखरेख शुल्क वसुल केले जाते. सोबत अहवालासोबत मिरजगांव व राशिन उपबाजार तक्ता जोडलेला असून त्यामधील एकत्रित माहिती पुढीलप्रमाणे-

जनावरे आवक सन २०२४-२५ - एकत्रित

अ क्र	जनावर प्रकार	आवक नग	विक्री नग	विक्री किंमत	बाजार फी	साक्षांकन फी ५पैसे
१	बैल	१४९०	८००	३६०००००	३६००००	१६००
२	गाय	२४००	१७००	९१३५००००	९१३५००	३४००
३	म्हैस	७६५	५९६	३१३१८१००	३१३१८१	११९२
४	शेळी	२६७१५	१५४५०	४३०५००००	४३०५००	१५४५०
५	मेंढी	१३३००	९२५०	२४५५००००	२४५५००	९२५०
६	बोकड	२८५७५	२२३३८	५९७५६०००	५९७५६०	२२३३८
	एकुण	७३२४५	५०१३४	२८६०२४१००	२८६०२४१	५३२३०

बाजार आवारात ७३२४५ जनावरांची आवक होऊन ५०१३४ जनावरांची विक्री झालेली आहे. त्यातून विक्री किंमत रुपये २८६०२४१००/- असून बाजार फीचा दर रुपये १ प्रति शेकडा असून त्यातून रु.२८६०२४१/- प्राप्त झाले आहेत. तर प्रवेश फी प्रति जनावर वसूल केले नाहीत. जनावरे प्रवेश फी घेण्यात यावी. साक्षांकन फी पोटी रुपये ५३२३०/- प्राप्त झालेले आहेत.

१३.शेतमाल आवक/उलाढाल –

सन २०२४-२५ मधील शेतमाल आवक/उलाढाल तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ क्र	शेतमालाचे नांव	आवक क्विंटल मध्ये	विक्री किंमत	बाजार फी दर	बाजार फी आकारणीची रक्कम
१	ज्वारी	२०८१५.००	५८२६००००	१%	५८२६००
२	बाजरी	९२४६.००	२३११५०००	१%	२३११५०
३	गहू	१७७८०.००	४८००६०००	१%	४८००६०
४	हरभरा	९५४५.००	९३०४९०००	१%	९३०४९०
५	मका	५७९१०.००	११७४६९०००	१%	११७४६९०
६	चिंच	२१५४८.००	६१२८८०००	१%	६१२८८०
७	मटकी	३००.००	२६६५०००	१%	२६६५०
८	मुग	२३०.००	१७४८०००	१%	१७४८०
९	तुर	३३६३२.००	२५५७२००००	१%	२५५७२००
१०	उडीद	२६२५५.००	२०५३९२०००	१%	२०५३९२०
११	सोयाबीन	१७६०.००	८३२००००	१%	८३२००
१२	चवळी	०.००	०	१%	०
१३	हुलगा	३३३.००	२५९२५००	१%	२५९२५
	एकूण अ)	**१९९३५४.००**	**८७७६२४५००**		**८७७६२४५**
				कर्जत मुख्यालय	५०६८१२५
				मिरजगाव बाजार	३७०८१२०
				राशिन उपबाजार	०
				अ) तक्त्याप्रमाणे एकूण	**८७७६२४५**
				ब) बाजार फी भाजीपाला	**१८०५००**
				क) बाजार फी कापूस	**६८६९५४९**
				अ+ब+क एकूण एकंदर	**१५८२६२९४**

सन २०२४-२५ मध्ये भाजीपाला/ कापूस /भूसाराची आवक बाजार समीतीत आवक झालेली असून त्यातून विक्री झाली असून त्यावर बाजार फीचा दर शेकडा १ टक्का म्हणजे रु १ असा असून त्यापासून बाजार समीतीस रु. १५८२६२९४/- बाजार फी प्राप्त कर्जत मुख्यालय झालेली आहे.

१४.अधिनियम, नियम व उपविधीचे उल्लंघनः-

खालील प्रमाणे उल्लंघनाची पुर्तता करण्यात यावी.

अधिनियम	नियम	उपविधी	उल्लंघनाचा तपशील
७	६ व ७	३.४	अनुज्ञप्तीशिवाय किंवा अनुज्ञप्तीमधील अटींचे उल्लंघन करणा-या विरुध्द वेळीच कार्यवाही करणे अत्यावश्यक आहे. तसेच आवश्यक ती कागदपत्र पूर्ण करुन घेतल्यानंतर पूर्ण चौकशीशिवाय अनुज्ञप्ती दिलेली आहे.
२९(२०)	-	-	तपासणी/पडताळणी केली नाही.

३४(ब)(२)	३४(अ)	-	देखरेख फी वेळीच भरणा केली नाही.
-	-	५	जामीनकी व करारनाम्याची पूर्तता करुन घेत जावी.
-	३०	८	अनुज्ञप्ती धारकांस बिल्ला/चिन्ह देणे जरुरीचे आहे.
-	३४	-	कर्मचा-यांनी बिल्ले लावावेत.
-	२०(३)	९	अनुज्ञप्तीधारकाने ठेवावयाचे कागदपत्र व नोंदवहया पूर्ण करणेस भाग पाडावे.
-	१११	-	पासबुके भरुन धेऊन अद्यावत नोंदी करुन घेतल्या नाहीत.
-	३२(२)	१३(१)	प्रमाणे बाजार फी व देखरेख शुल्क कोणत्याही परिस्थितीत ताबडतोब वेळेत वसुल करावेत.
-	११६ (१)	-	आवश्यक ती पुस्तके नमून्यात ठेवली नाहीत.
-	१०८	-	प्रमाणे खर्चाच्या सर्व रकमा धनादेशाव्दारेच देणे जरुरीचे आहे.
१४	-	२५	काटा व वजनमाप तपासणी नियमित केली जात नाही.
(सेवानियम)	-	१४	कर्मचारी व सेवापुस्ताकातील नोंदी अद्यावत ठेवल्या नाहीत.
२४(२)(१)	-	-	बाजारात येणा-या शेतकरी लोकांच्या वाहनांच्या वाहतुकीचे नियमन केले जात नाही.
-	११२(४)	-	अंदाजपत्रक तयार करणे व त्यापेक्षा जादा खर्च होणार नाही याची दक्षता घेणे.

१५. कर लेखापरीक्षण :-

तपासणी कालावधीत बाजार समीतीचे कर लेखापरीक्षण करुन घेतले नाही. तरी वेळीच संबंधितांकडून योग्य ती पूर्तता करुन घेण्यात यावी जेणे करुन समीतीस कोणत्याही प्रकारचे टॅक्सवर तोषीस बसणार नाही.

१६.अंतर्गत लेखापरीक्षण :-

बाजार समीतीने अंतर्गत लेखापरीक्षक यांची नेमणूक करुन बाजार समिती कामकाजातील दोष वेळीच दुरुस्त होऊन कर्मचा-यांचे कामकाजावर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल.

१७. संगणक प्रणाली :-

संस्थेस मा.पणन संचलनालय, यांनी संगणक पुरवलेले असून संगणक खरेदी केलेले आहेत. तथापी अद्यापही सर्व व्यवहार संगणकावर नोंदवून माहिती अॅटो सादर केली आहे. संगणक प्रणाली १०० टक्के राबविणे आवश्यक आहे. संगणक प्रणालीचे ई.डी.पी. ऑडीट करुन घेण्यात यावे. सर्व माहिती (डेटा) संगणकामध्ये भरण्याची कार्यवाही करावी. संगणक प्रणाली नूसार सीएएस नुसार रेकॉर्ड व आर्थिक पत्रके सादर केली नसून मॅन्युअली रेकॉर्ड व आर्थिक पत्रके सादर केलेली आहेत. तरी सी.एस.एस. नुसार रेकॉर्ड करण्याची कार्यवाही करावी.

१८. वजन काटे नूतनीकरण :-

बाजार समीतीत मिरजगांव उपबाजारात एक वजन काटा (भूईकाटा) आहे. तो वजन काटा ५० टनी आहे. सदर भूईकाटे व वजनमापे यांचे पासिंग दरवर्षी करुन घ्यावे लागते. त्याचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे.

१९. बांधकामे :-

सन २०२४-२५ या कालावधीत बाजार समीतीत कोणत्याही प्रकारचे मोठया स्वरुपातील तसेच खात्यांतर्गत बांधकामे झालेली नाहीत.

२०. एकुण वार्षिक उत्पन्न व खर्च तुलनात्मक आढावा :- तपशिल खालील प्रमाणे

अ क्र	तपशील	सन २०२३-२०२४	सन २०२४-२५	घट	वाढ
१	उत्पन्न	१४८५२३११.००	२०२९२२२९.००	-	५४३९९१८.००
२	खर्च	१४१७१०६०.९१	१७०६८७७०.०३	-	२८९७७०९.१२
३	वाढावा	६८१२५०.०९	३२२३४५८.९७	-	२५४२२०८.८८

गतवर्षापेक्षा तपासणी मुदतीत उत्पन्नामध्ये रु. ५४३९९१८/- इतकी वाढ झालेली असून खर्चामध्ये रु. २८९७७०९.१२ इतकी वाढ झालेली आहे. खर्चापेक्षा उत्पन्न अधिक असल्याने तपासणी मुदतीत समितीस रु. ३२२३४५८.९७ इतका निव्वळ वाढावा झालेला आहे. समितीने मागील तुटीमधून सदरचा वाढावा कमी असे समायोजन करण्याबाबत या अहवालातील उत्पन्न खर्चामध्ये सूचना करण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे बाजार समितीस गतवर्षीपेक्षा चालु वर्षात तूट कमी झालेली आहे. तुट कमी झालेली असून वाढावा निर्माण करुन संचित वाढाव्यामधून कायम बाजार निधी उभारण्याकरिता प्रयत्न करणे आवश्यक आहे. उत्पन्न वाढीसाठी भरारी पथक नेमण्यात यावे व थकीत रकमा वसूल करण्यात याव्यात. खर्चात वाढ होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. समीतीने जो जास्तीचा खर्च केला आहे त्याचे अंदाजपत्रक तयार करुन घेऊन तपास पणन मंडळाची मान्यता न घेता खर्च केलेला आहे.

२१.गोदाम :-

बाजार समीतीच्या मालकीची दोन गोदामे असून त्याची क्षमता प्रत्येकी ५०० मे.टन असून त्याचा आकार ७२ बाय ५६ असा असून ते मुख बाजार पेठेत एक व उपबाजार मिरजगांव येथे एक आहे.

२२.बाजारभाव :-

समीतीने त्यांच्या प्रवेशव्दारावर बाजारभावाबाबत डिजीटल बोर्ड लावला असून त्यावर बाजारात असलेले व इतर बाजारातील शेतमालाचे भाव दर्शवले जातात. तसेच बाजारभावाबाबत संगणकीकृत नोंद करुन ठेवली आहे. शेतक-यांना बाजारभाव दर्शवून त्यांच्या मालाला जास्तीत जास्त दर कसा प्राप्त होईल या बाबतीत योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

२३.आडत न घेण्याबाबत :-

मा पणन संचालक महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक क्रमांक ६६४८ दिनांक २६.७.२०१६ अन्वये बाजार समीतीमध्ये होणा-या व्यवहारावर आकारण्यात येणारी आडत ही खरेदीदार यांचेकडून वसूल करण्यात यावी अशी तरतूद बाजार समीती कायदा कलम ६ व पोटनियम २(अ) अन्वये करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे शेतक-यांकडून बाजार आवार अथवा बाहेर फळे, भाजीपाला व नाशवंत शेतमालावर आडत वसूल होणार नाही याची दक्षता घ्यावी व कागदपत्रे व परिपत्रकाचे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

२४.वाहने :-

बाजार समीतीच्या मालकीची वाहने नाहीत. परंतू वेळोवेळी गरजेनुसार भाडोत्री तत्वावर वाहने वापरण्यात येतात. परंतू सदर वाहनांबाबत लॉगबुक ठेवण्यात आलेले नाहीत. तसेच जे वाहने वापरण्यात येतात ते प्रादेशिक परिवहन विभागाकडे भाडोत्री तत्वावर नोंदणीकृत केलेले आहेत किंवा नाही याची शहानिशा करण्यात यावी. तसेच सदर वाहन वापरण्यापूर्वी त्याबाबत कार्यादेश देऊन त्या वाहनाचा दर नमूद करावा. तसेच लॉगबुकमध्ये वाहनाच्या नोंदी करुन त्याला लागलेले डिझेल, किलोमीटर, वाहन वापरण्या-याची सही, वाहन वापराचे कारण नमूद करण्यात यावे.

२५. व्यवस्थापन व दप्तरी कामकाज :-

बाजार समीतीचे दप्तरी कामकाज सर्वसाधारणपणे असून त्यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा होणे आवश्यक आहे.

१. मापाडयास बाजार समीतीकडून काटापट्टी बुके पुरविली जातात ती पुरविताना पूर्वी दिलेली व वापर पूर्ण झालेली काटापट्टी बुके परत घेऊन त्यानुसार व्यापारी बिले अहेत किंवा कसे याची पडताळणी करणे आवश्यक आहे.

२. काही व्यापारी हे आपल्या कुटुंबातील इतर सदस्यांचे नावाने पेढी काढून आडत व्यवसाय करीत नसल्याची खात्री करावी. अशा प्रकरणी बिलांची काळजीपूर्वक छाननी करणे आवश्यक आहे.

३. काही वेळा व्यापा-याकडून बाजार फीची वसुली रोखीने केली जाते. सदर बाबतीतील व्यवहार हे चेकनेच करणे आवश्यक आहे.

४. निविदा आवक रजिस्टर ठेवलेले नाही ते ठेवून आलेल्या निविदांची त्यामध्ये नोंद करण्यात यावी.

५. समीतीने स्टेशनरी साठा रजिस्टर ठेवलेले आहे. परंतू वापराबाबत स्वतंत्र नोंदी अद्यावत करण्यात याव्यात. स्टेशनरी छपाई बाबत वर्षभरात झालेल्या वापराची रक्कम खरेदी किमती नुसार काढून ती दरवर्षी उत्पन्न खर्च पत्रकास नावे टाकण्यात यावी.

६. स्टेशनरी साठा ज्या कर्मचा-याच्या ताब्यात आहे त्याची त्या बाबतची जबाबदारी निश्चित करावी. तसेच स्टेशनरी संबंधितास देण्यापूर्वी सचिवाची मंजूरी घेण्याची प्रथा अवलंबवावी.

७. कर्मचारी तसेच हमाल व तोलारी यांना बिल्ले लावणे बंधनकारक करावे.

२६.ताळेबंद विवेचन –

बाजार समीतीने सादर केलेल्या दिनांक ३१.०३.२०२४ अखेरच्या आर्थिक व सांपत्तिक स्थितीचे एकत्रित ताळेबंदाचे तुलनात्मक आर्थिक विश्लेषण/विवेचन पुढीलप्रमाणे आहे.

अ) कर्ज व देणे बाजु –

१. कायम निधी व इतर निधी - रु निरंक

अ) समीतीने सुरवातीपासूनच कायम निधी हे शीर्ष (हेड) सुरवातीपासून ताळेबंदास दर्शविलेले नाही. समीतीने वाढावा वर्ग करताना पणन मंडळाच्या सुचनेनुसार वाढावाच्या ८५ टक्के विकास निधी म्हणून व १५ टक्के रक्कम कायम निधीमध्ये विभागणी करावयाची आहे. परंतू समीती ही तुटीत असल्यामुळे कायम निधी नाही. समीतीने खर्चात बचत करुन व उत्पन्न वाढीचे स्त्रोत तयार करुन समीती वाढाव्यात कशी येईल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. ताळेबंदात कायम निधी हे शीर्ष (हेड) दर्शवण्यात यावे.

आ) शिल्लक वाढावा रु. १८,२७,३७८.८४

सन २०२३-२४ या कलावधीच्या मागील अहवालाप्रमाणे निव्वळ वाढावा रु. १८,१७,३७८.८४ एवढा वाढावा दि. ३१.०३.२०२४ अखेर दर्शविण्यात आलेला आहे. सन २०२४-२५ या लेखापरीक्षण कालावधीत ताळेबंदामध्ये रकाना ४ प्रमाणे मुख्यालय व राशिन यांचा रु. ३८४९२३८.९७ वाढावा तर मिरजगांव उपबाजार तूट रु. ६२५७८०/- रकाना ५ प्रमाणे असल्याने समितीस रकाना ६ प्रमाणे एकूण वाढावा रु. ३२,२३,४५८.९७ रु. **५०५१०३९.८१** असा एकूण वाढावा निदर्शनास येत आहे.

बाजार समितीचे सन २०२४-२५ चे ताळेबंदाप्रमाणे चालू शिल्लक वाढावा व तुट खालीलप्रमाणे असून तुटीतुन वाढावा वजा करुन ताळेबंदामध्ये दर्शविण्यात आलेला नाही. तो खालीलप्रमाणे -

अ.क्र.	बाजाराचे नांव	मागील तुट	चालू वाढवा	चालू तुट	एकूण वाढावा/ तुट रु.
१	२	३	४	५	६
१	कर्जत	४४२८३८०.८४	३३७९११९.९७	०.००	७८०७५००.८१
२	मिरजगाव	-२३८१८२९.००	०.००	६२५७८०.००	-३००७६०९.००
३	राशिन	-२२९१७३.००	४७०११९.००	०.००	२४०९४६.००
	फरक	१०२०२.००	०.००	०.००	१०२०२.००
	एकूण	**१८२७५८०.८४**	**३८४९२३८.९७**	**६२५७८०.००**	**५०५१०३९.८१**

समितीच्या सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या कालावधीच्या आर्थिक पत्रकामध्ये एकाच वेळी वाढावा आणि तूट दर्शविण्यात आलेली असल्याने त्याचे समायोजन केलेले नसल्यामुळे समितीची आर्थिक स्थिती रास्त व सत्यस्थिती दर्शविण्याची आलेली नाही. त्यामुळे मुख्यालय व उपबाजार यांच्या वाढ व घट प्रमाणे समायोजन व्यवहार दोष दुरुस्ती वेळी सुयोग्य व्यवहार करुन सादर करण्यात यावा.

२. डिपॉझीट - रु.७९५९२४/- यात खालीलप्रमाणे डिपॉझीट हे ताळेबंदानुसार आहे.

२.१) भूखंड डिपॉझीट - रु. २००००/-

तपासणी कालावधीमध्ये समितीने भूखंड डिपॉझिट जमा केले असून यादी पूरविलेली नाही रक्कम परत करताना मुळ पावती घेण्यात यावी व रकमेची शहानिशा करुनच परत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याची स्वतंत्र खतावणी ठेवलेली नसल्यामुळे रक्कम योग्य असल्याबाबत शहानिशा करता येत नाही.

२.२) सुरक्षा ठेव अनामत - ३८८५/-

तपासणी कालावधीमध्ये समितीने सुरक्षा / सिक्यूरीटी डिपॉझीट ठेव जमा केले असून यादी पूरविलेली नाही रक्कम परत करताना मुळ पावती घेण्यात यावी व रकमेची शहानिशा करुनच परत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याची स्वतंत्र खतावणी ठेवलेली नसल्यामुळे रक्कम योग्य असल्याबाबत शहानिशा करता येत नाही.

२.३) खत डिपॉझिट - रु.२००/-

सदर रक्कम गतवर्षीप्रमाणे कायम आहे. यादी पुरविलेली नाही त्यामुळे ताळेबंदात दर्शविलेली रक्कम योग्य असल्याबाबत शहानिशा करता येत नाही. सदर रक्कम ज्यांची देणे आहे त्यांच्याकडून रक्कम बरोबर असल्याचे कबूलीपत्रक मागविण्यात यावे. रक्कम परत करताना मूळ पावती घेण्यात यावी व रकमेची शहानिशा करुनच परत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याची स्वतंत्र खतावणी ठेवलेली नसल्यामुळे रक्कम योग्य असल्याबाबत शहानिशा करता येत नाही.

२.४) गाळा डिपॉझीट रुपये ३२७०००/-

सदर रक्कम गतवर्षीप्रमाणे कायम आहे. यादी पुरविलेली आहे. यात मिरजगांव उपबाजारातील २३ व्यापा-यांची एकुण रु. ३२७०००/- यादी सादर केली आहे. सदर रक्कम ताळेबंदात दर्शविलेल्या रकमेशी जुळते आहे. सदर रक्कम ज्यांची देणे आहे त्यांच्याकडून रक्कम बरोबर असल्याचे कबूलीपत्रक मागविण्यात यावे. रक्कम परत करताना मुळ पावती घेण्यात यावी व रकमेची शहानिशा करुनच परत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याची स्वतंत्र खतावणी नसल्यामुळे रक्कम योग्य असल्याबाबत शहानिशा करता येत नाही.

२.५) गोदाम डिपॉझीट रुपये २०,०००/-

सदर रक्कम गतवर्षीप्रमाणे कायम आहे. यादी पुरविलेली आहे. सदर रक्कम ताळेबंदात दर्शविलेल्या रकमेशी जुळते आहे. सदर रक्कम ज्यांची देणे आहे त्यांच्याकडून रक्कम बरोबर असल्याचे कबूलीपत्रक मागविण्यात यावे. रक्कम परत करताना मुळ पावती घेण्यात यावी व रकमेची शहानिशा करुनच परत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याची स्वतंत्र खतावणी ठेवलेली नसल्यामुळे रक्कम योग्य असल्याबावत शहानिशा करता येत नाही.

२.६) अनामत वँक भनिनी रु. २,४४,८३९/-

मागील ताळेबंदामध्ये बाजार समितीने राशिन उपबाजार कडील सहकारी बँक भनिनि बँक देणे दर्शविलेली होती. तरी सदर बँक खात्याचे पडताळा पत्रक तयार करुन त्याचा योग्य तो जमाखर्च करण्याची दक्षता घ्यावी.

३. सेवक देणे - रु. १,३७,०७,६३८.७०

३.१) विमा हप्ता रु. ४५,४११/-

सदर रक्कम मागीलप्रमाणे तरतूद केलेली असून त्याचा योग्य तो जमाखर्च करण्यात यावा.

३.२) भविष्य निर्वाह निधी - रु. १,१२,८८,३८६.७०

बाजार समीतीने कर्मचाऱ्यांचे पगारातून नियमाप्रमाण् कपात केलेली रक्कम भविष्य निर्वाह निधी खाती जमा केलेली आहे. याबाबत समीतीने यादी पुरवलेली असून यादीप्रमाणे बाकी बरोबर आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची गुंतवणुक स्वतंत्र खात्यात करण्यात यावी व त्याबाबत स्वतंत्र रेकॉर्ड ठेवण्यात यावे. ताळेबंदाप्रमाणे असणारी रक्कम स्वतत्र खाती पूर्णत: गुंतविण्यात यावी. भविष्य निर्वाह निधीची गुतवणूक ही समीतीच्या नावाने असल्यामुळे तिला यावर व्याजरुपाने रक्कम मिळत असून ती व्याज रक्कम उत्पन्न म्हणून समीती दर्शविते. समीती कर्मचाऱ्यांना त्यांच्या भविष्य निर्वाह निध्ी रकमेवर व्याज देत नाही तरी त्यावर शासनाने जाहीर केलेले भ.नि.निधीचे नियमाप्रमाणे व्याज देत जावे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची स्वतंत्र गुंतवणुक करण्यात यावी. सन २००४ च्या

आदेशानुसार समीतीचे विभाजन झालेले आहे त्यानुसार अटी व शर्तीनुसार व्यवहार अद्यापपर्यंत पूर्ण केलेले नाहीत. तरी व्यवहार पूर्ण करण्यात यावेत. समिती सदर रक्कम स्वतंत्र खाती गुंतवणुक न करता ती व्यवहारात वापरत आहे. याबाबत समीतीस तोषिस बसल्यास त्यास संचालक मंडळ व सचिव जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. तरी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी वेळचेवेळी बाजार समितीने भनिनि खाती भरण्याची दक्षता घ्यावी.

३.३) **संघटना वर्गणी- रु. १९७९०/-**

सदरची वर्गणी हे समीती कर्मचाऱ्यांच्या पगारातून कपात करुन संघटनेकडे देते. प्रत्यक्षात संघटनेकडे अदा करण्याची आवश्यकता आहे.

३.४) **सेवक उपदान - रु. १८८२४५९/-**

सदरची रक्कम मागीलप्रमाणे रु. १४६५१५४/-इतकी होती. तपासणी मुदतीत त्यामध्ये रु. ४१७३०५/- इतकी वाढ झालेली आहे. बाजार समितीने यादी पुरवलेली नाही. त्यामुळे देय उपदान योग्य असल्या बाबत शहानिशा करता येत नाही. स्वतंत्र खाती ठेवण्यात यावी. संपूर्ण रक्कम स्वतंत्र खात्यात गुंतविण्यात यावी. समीती सदर रक्कम स्वतंत्र खाती गुंतवणुक न करता ती व्यवहारात वापरत आहे. याबाबत समीतीस तोषीस बसल्यास त्यास संचालक मंडळ व सचिव हे जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

३.५) **सेवक सोसायटी रु. १९२०३२/-**

सेवक सोसायटी देणे असून तपासणी मुदतीनंतर सदरची रक्कम अदा केलेली आहे.

३.६) **कर्मचारी पगार देणी रु. २७९७८२/-**

वर्ष अखेरीस रु. २७९७८२/- इतके कर्मचारी पगार देणे असून ते देणेत यावे.

४. **इतर देणे रु. २,५१,४९,१९८.९१** खालीलप्रमाणे इतर देणे आहे.

४.१) **अनामत जमा - रु. ५,००,०००/-**

तपासणी कालावधीमध्ये अनामत जमा झालेली असून सदर रक्कम ज्यांची देणे आहे त्यांच्याकडून रक्कम बरोबर असल्याचे कबूलीपत्रक मागविण्यात यावे. रक्कम परत करताना मुळ पावती घेण्यात यावी व रकमेची शहानिशा करुनच परत करण्यात बाबत दक्षता घ्यावी. याची स्वतंत्र खतावणी ठेवलेली नसल्यामुळे रक्कम योग्य असल्याबाबत शहानिशा करता येत नाही.

४.२) **इंजिनिअर सुपरव्हिज फी देणे - रु. ५०,०००/-**

तपासणी कालावधीमध्ये सदर रक्कम अदा केलेली असून इंजिनिअर यांनी केलेल्या कामाची पडताळणी करुन रक्कम अदा करण्याची आवश्यकता आहे. रक्कम परत करताना मुळ पावती घेण्यात यावी व रकमेची शहानिशा करुनच परत करण्यात बाबत दक्षता घ्यावी. याची स्वतंत्र खतावणी ठेवलेली नसल्यामुळे रक्कम योग्य असल्याबाबत शहानिशा करता येत नाही.

४.३) **एम.डी. खाते राशिन रु. २,४६,७३५/-**

सदर रक्कम खर्ची टाकुन जमेस तरतूद केली.

४.४) **एस.ए.सी.पी. अनुदान रु. ३२,१०,००५/-**

कर्जत उपबाजाराकडील एम.ए.सी.पी. बांधकामापोटी प्राप्त अनुदानाची रक्कम जमा आहे.

४.५) **कर्जत कार्यालय वर्ग रु. ५,४४,३९४.३७**

मिरजगाव रु. ५४४३९४.३७ येणे मुख्याल देणी रु. ५८२१०९.८० असून मुख्यालय रु. ३७७१५.४३ जादा देणी दर्शवित आहे आपसांतील येणे - देणे तपासुन फरक रकमेचा योग्य तो जमाखर्च करण्यात यावा.

४.६) **कृषी पणन मंडळ अंशदान देणे - रु १४,९०,६४०/-**

सदर अंशदानाची रक्कम कृषी पणन मंडळाकडे कृषी पणन मंडळ पुणे यांचे परिपत्रक क्रमांक कृपम/अंशदान/१९६८ दिनांक ०६.०८.१९८६ प्रमाणे आर्थिक वर्ष संपल्यानंतर २ महिन्यांचे

आत देणे आवश्यक आहे. समितीने मागील आर्थिक वर्षाची अंशदान रक्कमेचा संपुर्ण भरणा केलेला आहे. तरी चालू आर्थिक वर्षाच्या अंशदानाची रक्कम महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाखू पुणे यांचेकडे सदर रक्कम त्वरीत भरणा करण्याची दक्षता घेण्यात यावी.

४.७) गोदाम अनुदान - रु.२,२१,५००/-

सदर रक्कम गतवर्षीप्रमाणे कायम आहे. याबाबत सदर रक्कम कधीपासून देणे आहे याचा तपशील उपलब्ध झाला नाही. याबाबत योग्य तो ताळमेळ घेण्यात यावा.

४.८) चारा डेपो - रु १७,११८/-

सदर रक्कम गतवर्षीप्रमाणे कायम आहे. सदर रक्कम शासकीय कोपागारात भरणा करण्याबाबत मागील लेखापरीक्षण अहवालात नमूद करुन सुध्दा त्यांची पूर्तता केलेली नाही. तरी सदर बाबी योग्य ती पूर्तता त्वरीत करण्यात यावी.

४.९) छपाई खाते देणे - रु २,७५०/-

सदर रक्कम गतवर्षीप्रमाणे कायम आहे. सदर रक्कम ज्यांची देणे आहे त्यांच्याकडून रक्कम बरोबर असल्याचे कबूलीपत्रक मागविण्यात यावे. रक्कम परत करताना मुळ पावती घेण्यात यावी व रकमेची शहानिशा करुनच परत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याची स्वतंत्र खतावणी ठेवलेली नसल्याने रक्कम योग्य असल्याबाबत शहानिशा करता येत नाही.

४.१०) छावणी खर्च देणे - रु ५,७५,५१९/-

सदर रक्कम गतवर्षीप्रमाणे कायम आहे. रक्कम योग्य असल्याबाबत कबुलीपत्रक मागवावे व योग्य शहानिशाअंती रक्कम देणेबाबत विचार करावा. रक्कम योग्य असल्याबाबत संबंधितांचे कबुलीपत्रके मागविण्यात यावीत. याची स्वतंत्र खतावणी ठेवलेली नसल्याने रक्कम योग्य असल्याबाबत खात्री करता येत नाही.

४.११) जी. ए. टी. देणी रु. ८८१८/-

तपासणी कालावधीमध्ये सदर रक्कम देणी असून तात्काळ अदा करण्यात यावी.

४.१२) ठेकेदार देणी रु. १८९६.६०

कर्जत उप बाजाराकडील एम.ए.सी.पी. बांधकामापोटी ठेकेदारांची देणी असून त्याची खात्री करुन चेकने रक्कम अदा करण्यात यावी.

४.१३) इतर देणे रु. ५४६२३९/-

समितीने यादी पुरविलेली नसून सदर रक्कमेची खात्री करुन रक्कम अदा करण्यात यावी..

४.१४) प्रचार व प्रसिध्दी देणी - रु. १६०००/-

तपासणी कालावधीमध्ये सदर रक्कम देणी असून जाहिरात खर्च केलेला आहे. खात्री करुन रक्कम अदा करण्यात यावी.

४.१५) बाजार संघ वर्गणी रु. ३०,०००/-

सदर रक्कम खर्ची टाकुन जमेस तरतूद केली.

४.१६) भ. नि. अंशदान देणी रु. ८४७१८६/-

सदर रक्कम तात्काळ भरणा करण्याची आवश्यकता आहे.

४.१७) भ.नि.नि. सहकारी बँक रु. ८,३५३.७७

भ.नि.नि. बँक सेव्हींग खात्यावरील व्याज खाती जमा घेतले. सदर रक्कम भ.नि.नि. खाती घेण्शत यावी.

४.१८) भ.नि.नि. अग्रिम व्याज देणे रु. ८७,६८५/-

सदर रक्कम सेवकांची भ.नि.निधीवरील घेतलेल्या अग्रिमावरील देणे व्याजाची आहे.

४.१९) मिरजगांव देणे रु. ३०,०००/-

सदर रक्कम मागील ताळेबंदाप्रमाणे कायम असून त्याचा योग्य तो जमा खर्च करण्यात यावा.

४.२०) अनामत रुपये ७०,१९,५७६.६०

गतवर्षी या खाती रु. ५३,४६,४५९/- इतकी होती. तपासणी मुदतीत त्यामध्ये रु. १६७३११७६/- इतकी वाढ झालेली आहे. रक्कम योग्य असल्याबाबत संबंधितांचे कबूलीपत्रके मागविण्यात यावेत. याची स्वतंत्र खतावणी ठेवलेली नसल्यामुळे रक्कम योग्य असल्याबाबत शहानिशा करता येत नाही. त्यामुळे दि.३१/३/२०२४ अखेर रु. ७०,१९,५७६.६० इतकी रक्कम देणे दिसत आहे.

सदर रक्कम मागील ताळेबंदाप्रमाणे देणी असल्याचे निदर्शनास येत आहे. सदर रक्कमांचे अंतर्गत तपासणीद्वारे ताळमेळ घेण्यात येवून समितीने व्यापाऱ्यांकडून ज्या-त्या आर्थिक वर्षामध्ये अनामत / ॲडव्हान्स पोटी बाजार फी, अनुज्ञाप्ती फी, सुपरव्हिजन फी व भूखंड भाडे व इतर रक्कमा जमा केल्याच्या हिशेबी नोंदी प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहेत. सदर अनामत रक्कमेचा अंतर्गत तपासणीमध्ये सदर व्यवहाराची खात्री करतांना वर्षेनिहाय अनामत रक्कमेचा पडताळा घेण्यात यावा आणि अनामत देणीच्या रक्कमेमधील बाजार फी, सुपरव्हिजन फी, अंशदान या शासकीय रक्कमांचा तात्काळ भरणा करण्याची आवश्यकता आहे. संचालक मंडळाच्या मंजुरीने इतर रक्कमांचा सुयोग्य व्यवहार करण्यात यावा.

४.२१) राशीन गाळा डिपॉझीट रु. ५३११९९८

तपासणी कालावधीमध्ये राशीन उपबाजारातील गाळा धारकांची डिपॉझिट पोटी रक्कम जमा असून एकत्रित ताळेबंदामध्ये मिरजगाव व राशिन अशी वेगवेगळी रक्कम दर्शविलेली असून यापुढे एकत्रित गाळा डिपॉझिट रक्कम देणी दर्शविण्यात यावी.

४.२२) मिरजगांव वाढावा रु. १०१५७२३/-

ताळेबंदानुसार रु. १०१५७२३/- वाढावा आहे मात्र तपासणी कालावधीमध्ये तूट रु. ६२५७८०/- असल्याने समायोजन करुन नक्तस्थिती प्रमाणे वाढावा रु. ३८९९४३.०० शिल्लक वाढावा ताळेबंदास दर्शविण्याची आवश्यकता असतांना दर्शविलेला नाही सुयोग्य जमा-नावे व्यवहार करण्यात यावा.

४.२३) राशिन वाढवा रु. २२९१७३/-

ताळेबंदानुसार रु. २२९१७३/- वाढावा आहे. मात्र तपासणी कालावधीमध्ये वाढावा रु. ४७०११९/- असल्याने समायोजन करुन नक्तस्थिती प्रमाणे वाढावा रु. ६९९२९२/- शिल्लक वाढावा ताळेबंदास दर्शविण्याची आवश्यकता असतांना तो दर्शविलेला नाही सुयोग्य जमा-नावे व्यवहार करण्यात यावा.

४.२४) व्यवसाय कर देणे रु. ४०५६९५/-

सदर रक्कम तात्काळ शासनास भरणा करण्याची आवश्यकता असून भरणा करण्यात यावी. विलंबामुळे दंडाची रक्कम समितीस भरणा करावी लागल्यास त्यास सचिव व संचालक मडळ हे जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

४.२५) सबयार्ड देणे राशिन रु. २,२९,१७३/-

मुख्यालयाने मिरजगांव व राशिन उपबाजार यांचे आपसांतील येणी-देणी रक्कमेचा ताळमेळ घेवून सुयोग्य व्यवहार करावा जेणे करुन प्रत्यक्षात उपबाजार यांच्या मुख्यालयाशी येणी-देणी रक्कम रास्त व सत्य दर्शविण्याची आवश्यकता आहे.

४.२६) **बॅन्क करंट - रु ३०,२७२.१४**

सदर रक्कम गतवर्षीप्रमाणे कायम आहे. ताळमेळ पत्रक तयार करुन सादर केलेले नाही. योग्य तो ताळमेळ घेऊन खाते जुळवुन घेण्यात यावे. त्यामुळे दर्शविलेली रक्कम योग्य असल्यामुळे शहानिशा करता येत नाही.

४.२७) **सुपरव्हिजन फी - रु. २४७२७४८.४३**

सदर रक्कम शासकीय कोषागारात त्वरीत भरण्यात यावी. सुपरव्हिजन फी ही ज्या महिन्यात वसूल केलेली आहे त्यानंतर १५ दिवसात ती भरणे आवश्यक आहे. सदर रक्कम भरणा न केल्यास त्यावर समीतीस काही तोशीष बसल्यास त्यास संचालक मंडळ तसेच सचिव हे जबाबदार राहतील व तसे झाल्यास सदर रक्कम संचालक मंडळ व सचिव यांच्याकडून वसूल करण्यात यावे.

५. **झीज फंड - रु. ५२,८९,८८८.८५** खालीलप्रमाणे आहे.

५.१) **डेडस्टॉक झीज फंड रु. ११,३१,६५८.८५**

डेडस्टॉकवर जो घसारा आकारलेला आहे त्याची रक्कम या खाती वर्ग केलेली आहे. आयकर कायद्यानूसार घसारा आकारणी करण्यात यावी. सदर निधीची स्वतंत्र खात्यात गुंतवणुक करण्यात यावी. समीती सदर रक्कम व्यवहारात वापरत आहे तरी रक्कम स्वतंत्र खात्यात गुंतविण्यात यावी.

५.२) **मालमत्ता झीज फंड - रु ४१,५८,२३०/-**

मालमत्तेवर जो घसारा आकारलेला आहे त्याची रक्कम या खाती वर्ग केलेली आहे. आयकर कायद्यानूसार घसारा आकारणी करण्यात यावी. सदर निधीची स्वतंत्र खात्यात गुंतवणूक करण्यात यावी. समीती सदर रक्कम व्यवहारात वापरत आहे तरी रक्कम स्वतंत्र खात्यात गुंतविण्यात यावी.

६. **अनामत देणी रु. ८,८९,४९६.७६** खालीलप्रमाणे आहे.

६.१) **अनुज्ञप्ती अनामत देणी - रु २,४१,११०/-**

सदर रक्कम ताळेबंदानूसार आहे. परंतू यादी पुरविली नसल्यामुळे शहानिशा करता येत नाही. रक्कम योग्य असल्याबाबत संबंधितांचे कबुलीपत्रके मागविण्यात यावे व योग्य शहानिशेअंती रक्कम परत करण्याबाबत विचार करावा. याची स्वतंत्र खतावणी ठेवलेली नसल्यामुळे रक्कम योग्य असल्याबाबत शहानिशा करता येत नाही.

६.२) **निवडणूक अनामत - रु ४६,९००/-**

सदरची रक्कम निवडणूक अर्ज ज्यांनी भरणा केलेले आहेत त्यांची असून योग्य ती खात्री करुन संबंधितांना परत करण्यात यावी. यादी पुरविलेली नाही. याची स्वतंत्र खतावणी ठेवलेली नसल्यामुळे रक्कम योग्य असल्याबाबत शहानिशा करता येत नाही. सदर रक्कम गतवर्षीप्रमाणे कायम आहे.

६.३) **बयाणा रक्कम - रु ५,८२८/-**

सदर रक्कम गतवर्षीप्रमाणे कायम आहे. यादी पुरविलेली आहे ती ताळेबंदात दर्शविलेल्या रकमेशी जुळते. सदर रक्कम ज्यांची देणे आहे त्यांच्याकडून रक्कम बरोबर असल्याचे कबूलीपत्रक मागविण्यात यावे. रक्कम परत करताना मुळ पावती घेण्यात यावी व रकमेची शहानिशा करुनच

परत करण्यात बाबत दक्षता घ्यावी. याची स्वतंत्र खतावणी ठेवलेली नसल्यामुळे रक्कम योग्य असल्याबाबत शहानिशा करता येत नाही.

६.४) भूखंड भाडे अनामत रु. ३,६८,९६०/-

सदर रक्कम ताळेबंदानूसार आहे. पंरतू यादी पुरविली नसल्यामुळे शहानिशा करता येत नाही. रक्कम योग्य असल्याबाबत संबंधितांचे कबुलीपत्रके मागविण्यात यावे व योग्य शहानिशेअंती रक्कम परत करण्याबाबत विचार करावा. याची स्वतंत्र खतावणी ठेवलेली नसल्यामुळे रक्कम योग्य असल्याबाबत शहानिशा करता येत नाही.

६.५) सहकारी बँक सेव्हींग रु. १९३७४.७६

सदर रक्कम गतवर्षीप्रमाणे कायम आहे. ताळमेळ पत्रक तयार करुन सादर केलेले नाही. योग्य तो ताळमेळ घेऊन खाते जुळवुन घेण्यात यावे. त्यामुळे दर्शविलेली रक्कम योग्य आहे किंवा नाही याबाबत शहानिशा करता येत नाही.

६.६) सुरक्षा ठेव अनामत रु. ६,६०९/-

सदर ताळेबंदामध्ये लेखाशिर्ष क्र. २.२ मध्ये सुरक्षा ठेव अनामत - ३८८५/- देखील देणी दर्शविलेली आहे. इंग्रजी आणि मराठी लेखाशिर्ष निर्माण झालेले असून त्याचे एकत्रित रक्कमा दर्शवून सुरक्षा / सिक्युरीटी ठेव अनामत वेगवेगळे लेखाशिर्ष निर्माण झालेले एकत्रित ताळेबंदामध्ये मुख्यालय, मिरजगांव व राशिन उपबाजार यांच्या रक्कमेची विगतवारी करण्यात आलेली असून ती एकत्रित लेखाशिर्षानिहाय रक्कमा जमा-नांवे व्यवहार करण्याची आवश्यकता आहे.

ब) जिंदगी व येणी –

१ रोख शिल्लक - रु.१९१३९३.००

दिनांक ३१.०३.२०२५ रोजीची हातावरील असणारी रोख शिल्लकेची रक्कम आहे. यात कर्जत मुख्य बाजारपेठ व मिरजगांव व राशीन उपबाजारातील रोख रकमेचा समावेश आहे. हातावर रोखरक्कम शिल्लक मर्यादा ही रु ५००/- इतकी समीतीने ठरविलेली असून सदरचे उल्लंघन वारंवार करण्यात आलेले आहे. तरी हातावर रोख रक्कम ठेवण्याचे बंधन पाळण्यात यावे व शिल्लक रक्कम त्वरीत भरणा करावी अन्यथा त्यास संबंधित जबाबदार राहातील याची नोंद घ्यावी. रोख व मालमत्ता सांभाळणा-यांकडून तारण घेण्यात यावे. रोख रकमेचा कॅश इन हॅण्ड व कॅश इन ट्रान्झीटचा विमा उतरविण्यात यावा. रोख रकमेत पैशाचा समावेश आहे याबाबत योग्य तो निर्णय घेऊन पूर्णांकीत रक्कम करण्यात यावी याबाबत विचार करावा. लेखापरीक्षणावेळी रोख मोजण्यासाठी रोजकीर्द अपूर्ण आहे. त्यामुळे लेखापरीक्षणावेळी रोख रक्कम मोजता आलेली नाही.

२ बँक शिल्लक रु. २१,१९,६७८.५७

यामध्ये खालील रकमा दि. ३१.०३.२०२५ अखेरच्या आहेत.

अ.क्र	बँकेतील शिल्लक	ताळेबंदाप्रमाणे बाकी	बँक बाकी पत्रकाप्रमाणे	शेरा
१.	अर्बन बँक स्पेशल सेविंग खाते-कर्जत	४७६०.०९	पास बुक नाही	खाते बंद खुलासा
२.	अ.नगर जि. म. सह. बँक - भ नि नि खाते कर्जत	१४६६.००	पास बुक नाही	खाते बंद खुलासा
३.	अ.नगर जिल्हा म. सह. बँक - सेविंग राशीन .	१२९६३.२९	११७८१४.२३	१०४८५०.९४ जादा

४.	अ.नगर जिल्हा म. सह. बँक बचत खाते ११००	६५६२०८.००		
५.	एच डी एफ सी बँक	१४९१३१.००		
६.	पोस्ट सेविंग खाते	१०४०.००	पास बुक नाही	खाते बंद खुलासा
७.	बँक ऑफ महाराष्ट्र	५६१०५८.७५	२५९००७.५५	३०२०५१.२० कमी
८.	बँक ऑफ महाराष्ट्र	५०००.००	पास बुक नाही	खाते बंद खुलासा
९.	बँक ऑफ महाराष्ट्र - जनावरे	१५८८३.३२	१५८१७.६०	६५.७२ कमी
१०.	बँक ऑफ महाराष्ट्र - शॉपिंग खाते	६१२१९३.३४	७५६०११.९८	१४३८१८.६४ जादा
११.	बँक सविंग भ नि नि खाते	११००३.२३	पास बुक नाही	खाते बंद खुलासा
१२.	बँक से न १	१३९६६.०१	पास बुक नाही	खाते बंद खुलासा
